दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २४१ I रविवार १४ जून २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'

भाग ८१

**परमेश्वर प्राप्ती.....** परमेश्वराने ही सृष्टी रचली. आपल्याला माहीतच आहे, इथे पुष्कळ विद्वान लोक आहेत, की कशी पृथ्वीची रचना ओंकारापासून झाली आणि किती त्याच्यावर परमेश्वरानी मेहनत घेतली आहे. त्यापुढे त्या पृथ्वीवर वनस्पती, त्यानंतर अनेक प्राणी निर्माण करून त्यांची हजारो वर्षे जोपासना केली. त्या जोपासनेतून हळूहळू त्यांची निवड करून त्यांना या अशा स्थितीला आणून पोहोचवलंय जिथे आपण त्या प्राण्यांना मात करून आज मानव प्राणी तयार केलेला पहातो आहोत आपल्याला कळलंच पाहिजे की त्या अमीबापासून मनुष्य का झाला आणि हे समजलं पाहिजे की जो परमेश्वर, ज्याने आपल्याला बनवलेले आहे, ज्याने सर्व सृष्टी रचलेली आहे, तो कोण आहे ? कसा आहे? परमेश्वराने सृष्टी घडवली, मानव घडवला की मानवाने परमेश्वराला जाणलं पाहिजे आणि ही साधी गोष्ट आहे. तुम्हाला मुलगा होतो, तुम्ही त्याला मोठं करता आणि आपली सगळी संपदा त्याला लिहून देता. तसंच परमेश्वराचं आहे. त्यांनी तुम्हाला निर्माण केलं, त्या स्थितीला आणून पोहोचवलं. आता त्याची अशी इच्छा आहे, की त्याची शक्ती तुम्हाला मिळावी.अशा प्रेमळ पित्यापासून तुम्हाला जे काही मिळालेलं आहे ते तुम्ही अजून जाणलेलं नाही. ते तुम्हाला माहीत नाही. म्हणून त्याच्या अनेक तऱ्हा निघालेल्या आहेत. आता आमचा जन्म आम्ही महाराष्ट्रात का घेतला? महाराष्ट्र खरंच जसं नाव आहे तसाच महा+राष्ट्र आहे. ही संतांची भूमी आहे. हा परत एक इतिहास आहे. संतांनी या भूमीला सुंदर केलेलं आहे. आपल्या भक्तीनी, तुमचे धर्म सांभाळलेत, तुमचं पावित्र्य सांभाळलंय त्यांनी. हे कशासाठी ? रात्रंदिवस आपण यज्ञ करतो, पाठ करतो, मंदिरात जातो, चर्चमध्ये जातो, नमाज पढतो, ते कशासाठी ? करण्यासाठी म्हणून नाही तर काही तरी त्याचा हेतू पुढचा आहे. तो जो हेतू आहे तो आत्मज्ञानाचा आहे. आम्ही आपल्या आत्म्याला जाणलं पाहिजे, आत्म्याला ओळखलं पाहिजे ही त्याच्यामध्ये ओढ आहे म्हणून आपण हे सगळे करतो.खर तर म्हणजे जोपर्यंत आपण आपल्या आत्म्याला ओळखत नाही तोपर्यंत परमेश्वराच्या नावाने आपण काही जरी केलं तरी ते परमेश्वराला पोहोचत नाही.२५ फेब्रुवारी १९७९ पुणे अधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# कर्जमाफीचा सरसकट लाभ दिल्याशिवाय माघार नाही

## आमदार रोहित पवार ठाम : अन्नत्याग आंदोलनाचा तिसरा दिवस

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**पंढरपूर :** शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी कालपासून (१२ जून) पंढरपुरात अन्नत्याग आंदोलन सुरु केलं आहे. रोहित पवारांच्या अन्नत्याग आंदोलनाचा आज तिसरा दिवस आहे. आम्हीही जिद्दी आहोत. जोपर्यंत कर्जमाफीमधील अटी काढून सर्वांना दोन लाख रुपयाची कर्जमाफी होत नाही, तोपर्यंत अन्नत्याग आंदोलन थांबणार नाही, असा इशारा रोहित पवार यांनी दिला.

पंढरपुरात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी सुरू असलेल्या आमदार रोहित पवार यांच्या 'अन्नत्याग' आंदोलनावळी पंढरपूरचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक स्वतः मध्यस्थी करत असून, त्यांनी आंदोलनस्थळावरूनच आमदार रोहित पवार यांची थेट राज्याचे कृषिमंत्री आणि सहकार मंत्र्यांशी फोनवर चर्चा घडवून आणली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अतिरिक्त पोलीस अधीक्षकांच्या पुढाकाराने रोहित पवार यांची कृषिमंत्री आणि सहकार मंत्र्यांशी सविस्तर चर्चा झाली आहे. राज्याच्या कॅबिनेट मंत्र्यांनी २०१९ च्या कर्जमाफीची जाचक अट मागे घेण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याचे माध्यमांसमोर जाहीर करावे, तरच आम्ही हे अन्नत्याग आंदोलन स्थगित करण्याचा विचार करू, अशी भूमिका रोहित पवारांनी घेतली आहे. दरम्यान या संवेदनशील प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी येत्या सोमवारी किंवा (पान ४ वर)



पंढरपूर : विविध पक्ष आणि संघटनांचे प्रतिनिधी अन्नत्याग आंदोलनास्थळी आमदार रोहित पवार यांची भेट घेऊन पाठिंबा देत आहेत...

### मी सुद्धा उपोषण करणार....

भाजपा महायुती सरकारने जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफी ही फसवी असून जाचक अटींमुळे लाखो शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे संपूर्ण कर्जमाफी करून सात-बारा कोरा करा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे सुरु केलेल्या उपोषणाला काँग्रेस पक्षाचा पाठिंबा आहे. त्यांनी केलेल्या मागण्या रास्त आहेत, त्या सरकारने तात्काळ मान्य करायला हव्यात. रोहित पवार यांच्या उपोषणस्थळी जाऊन मी सुद्धा उपोषण करणार आहे.

– हर्षवर्धन सपकाळ, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष

## महत्त्वाचे..



### नीरव मोदीसह इतरांवरील भ्रष्टाचाराचे आरोप रद्द

मुंबई : पंजाब नॅशनल बँकेची ३२१.८८ कोटी रुपयांच्या फसवणुकीप्रकरणी 'सीबीआय'ने नीरव मोदी, त्याच्या कंपन्या आणि एका प्रकरणात, भ्रष्टाचार प्रतिबंधक इतर संचालकांविरुद्धच्या प्रकरणांपैकी कायद्यांतर्गत लावलेले आरोप विशेष सीबीआय न्यायालयाने गुरुवारी (ता.११) रद्द केले.पंजाब नॅशनल बँकेच्या कोणत्याही लोकसेवकाविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा सिद्ध नसल्याचे तपासादरम्यान आढळून आले. तसेच, आता केवळ खासगी व्यक्तींविरुद्धच आरोपपत्र दाखल केले जाणार असल्याचेही सीबीआयकडून न्यायालयाला सांगण्यात आले. त्याचप्रमाणे, नीरव मोदी, त्याच्या कंपन्या आणि इतर संचालकांविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप रद्द करण्याची विनंती विशेष न्यायालयाकडे करण्यात आली.

# वाढदिवसानिमित्त मंत्री विखे-पाटील यांची 'वहीतुला'

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्राध्यापक, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी अनोख्या पद्धतीने शुभेच्छा देत त्यांच्या 'वहीतुले'चा कार्यक्रम आयोजित केला. यावेळी गरजू विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणात वह्या आणि शैक्षणिक साहित्य संकलित करण्यात आले.

### गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य संकलन

मंत्री विखे-पाटील यांनी वाढदिवसानिमित्त बुके, हार, शाल-श्रीफळ आणि इतर भेटवस्तूंवर होणारा खर्च टाळून तो निधी गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी वापरण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला कार्यकर्ते, हितचिंतक, सामाजिक संस्था तसेच शैक्षणिक क्षेत्रातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. (पान ४ वर)



वाढदिवसाच्या दिवशी मी लोणीमध्ये उपलब्ध नसल्यामुळे शुभेच्छा देण्यासाठी कोणीही येऊ नये, अशी विनंती ना. विखे-पाटील यांनी कार्यकर्ते आणि हितचिंतकांना केली असून आपल्या सर्वांच्या शुभेच्छा आणि ज्येष्ठांचे आशीर्वाद सदैव माझ्या पाठीशी असल्यामुळेच कार्य करण्यासाठी सातत्याने मला ऊर्जा मिळते. वाढदिवसाचा कोणताही कार्यक्रम न करता यंदाच्या वर्षी गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमात योगदान द्यावे

– राधाकृष्ण विखे-पाटील

# पाण्याची आवर्तने तात्काळ बंद करा

## एल निनोमुळं पर्जन्यमानात घट : जलसंपदा विभागाचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** भारतीय हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार यावर्षी एल निनो परिस्थितीचा प्रभाव राहण्याची शक्यता आहे. पर्जन्यमानात घट होण्याची शक्यताही वर्तविली आहे. यासर्व पार्श्वभूमीवर राज्यातील विविध धरणं, जलाशय आणि जलस्त्रोतांमध्ये उपलब्ध असलेला पाणीसाठा संरक्षित करुन, सुरु असलेली पाण्याची आवर्तन तात्काळ बंद करण्याचे निर्देश जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डौले यांनी सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

या संदर्भात शासनाने काढलेल्या परिपत्रकात सर्व जिल्हाधिकारी व संबधित जलसंपदा विभागाच्या आधिका-यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील धरणं व जलाशयांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा तातडीने आढावा घ्यावा. अत्यावश्यक परिस्थिती वगळता पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या पाण्याचा वापर इतर कोणत्याही कारणांसाठी करु नये. दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत सर्व शहरी व ग्रामीण भागात अखंडीत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होईल यासाठी धरणांमध्ये आरक्षित करण्यात आलेला पाणीसाठा जपून वापरण्याबाबतही जिल्हास्तरावर कृती आराखडा तयार करण्याच्या सुचना प्रधान सचिवांनी दिल्या आहेत.

यासाठी महसूल, पोलिस व जलसंपदा विभागाच्या आधिका-यांच्या संयुक्त पथकांमार्फत अनधिकृत मोटारी, पाईपलाईन, पंप व इतर सामुग्रींची तपासणी करण्याकरीता गस्त आयोजित करावी व वेळप्रसंगी दिनांक १२ डिसेंबर २०१८ रोजी काढण्यात आलेल्या (पान ४ वर)

स्थानिक स्वराज्य संस्था, पाणी पुरवठा विभाग यांच्यात प्रभावी समन्वय ठेवून परिस्थितीचा नियमित आढावा घेण्याबाबत तसेच धरणं, कालवे, नद्या, तलाव व इतर जलस्त्रोतांमधून होणारा अनाधिकृत व बेकायदेशिर पाणी उपसा तात्काळ थांबविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देशही शासनाने काढलेल्या परिपत्रात देण्यात आले आहेत.

# प्रसुतीत महिलेचा मृत्यू?

## नातेवाईकांचा केला आरोप; संतप्त नातेवाईकाकडून आयसीयूची तोडफोड



श्रीरामपूर – रुग्णालयातून शवविच्छेदन करून मृतदेह परत आणताना नातेवाइकांनी रुग्णवाहिका थेट शहर पोलीस ठाण्यासमोर आणला होता. नातेवाईकांसह जमलेल्या जमावाने तेथे रास्तारोको आंदोलन केले. (छाया :अनिल पांडे)

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** प्रसुतीत दरम्यान एका महिलेची प्रकृती चिंताजनक झाल्याने तिला साखर कामगार रूग्णालयात तिच्यावर उपचार सुरूच असतानाच तिचा मृत्यू झाल्याने संतप्त झालेल्या नातेवाईकांनी आयसीयुची तोडफोड केल्याची काल मध्यरात्री श्रीरामपूरात घडली.त्या महिलेची प्रसुती डॉ.मैड यांच्या हॉस्पीटलमध्ये झाली.

मिळालेल्या माहितीनुसार बुशरा समीर( पठाण, सय्यद,वय २२ रा.श्रीरामपूर) या महिलेला प्रसुतीसाठी जिजामाता चौकाजवळील असणार्या डॉ.मैड हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते.त्या महिलेची प्रसुती शस्त्रक्रिया करून झाली.मात्र बाळ जन्माला मैड आल्यानंतरच सदरच्या महिलेची प्रकृती अचानकपणे बिघडली.त्यामुळे लगेच तातडीने या महिलेस साखर कामगार रूग्णालयातील आयसीयुत दाखल करण्यात आले.त्याठिकाणी उपचारादरम्यान त्या महिलेचा मृत्यू झाला. त्याच दरम्यान महिलेच्या नातेवाईकांना महिला मयत झाल्याचे समजताच नातेवाईक संतप्त झाले.नातेवाईक आक्रमक होत रूग्णालयात आयसीयुमध्ये तोडफोड केली, खिडक्यांच्या काचा फोडल्या तसेच चारचाकी वाहनाची काच फोडली.त्यामुळे भागात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.याठिकाणी असणारे एका डॉक्टराला यांना धमकावून त्यास चाकू लावल्याचे चर्चा शहरात सुरू आहेत. मात्र अनेक लोक जमाव हा साखर कामगार रूग्णालयामध्ये जमले.मध्यरात्रीची वेळ असल्याने तेथे ठराविकडॉक्टर रात्रीच्या वेळी हॉस्पीटलमध्ये असल्याने या जमावाने तोडफोड करत, (पान ४ वर)

### महिलेचा 'मृतदेह' घेऊन नातेवाईक पोलीस ठाण्यात!

संतप्त झालेल्या नातेवाईकांनी सकाळी महिलेचा मृतदेह घेऊन शहर पोलीस ठाण्यात दाखल झाले होते. त्यावेळी मोठा जमाव रुग्णालयातून शवविच्छेदन करून मृतदेह परत आणताना नातेवाइकांनी रुग्णवाहिका थेट शहर पोलीस ठाण्यासमोर उभी करून रास्तारोको आंदोलन केले. काहीकाळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. यावेळी नातेवाईकांनी पोलीस अधिकाऱ्याना निवेदन देत डॉ. मैड हॉस्पीटलवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली.

### उशिरापर्यंत गुन्हा दाखल नाही

याप्रकरणी अद्यापही कोणातही गुन्हा दाखल नाही.शासकीय डॉक्टराचा अहवाल प्राप्त झाल्यानतर नक्की पुढील प्रक्रिया सुरु होईल. असे पोलीस सुत्रांकडून माहिती मिळाली.

# पतीने पत्नीसह दोन मुलांना संपवून केली आत्महत्या

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**वाशीम :** वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. तिवळी येथे एकाच कुटुंबातील चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. पत्नी आणि दोन चिमुकल्या मुलांना विहिरीत टाकल्याचा संशय आहे.

**■ दरम्यान, वाशिम जिल्ह्यात घडलेल्या या घटनेनं खळबळ माजली आहे. या चौघांचा अंत नेमका कोणत्या कारणातून झाला आहे, याची माहिती अद्याप मिळालेली नाही. मात्र, कुटुंबातील वादातून ही घटना घडल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.**

त्यानंतर पतीनं आत्महत्या केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. संतोष तुकाराम बकाल (वय ३५) यांनी महावितरणच्या पॉवर ग्रीड टॉवरला गळफास घेऊन जीवन संपवलं आहे. मृतांमध्ये पत्नी वर्षा बकाल (वय २८), मुलगी जान्हवी बकाल (वय ७) आणि मुलगा सोहम बकाल (वय ५) यांचा समावेश आहे.

दोन्ही चिमुकल्या मुलांचे हात बांधलेल्या अवस्थेत आढळल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. कुटुंबातील वादातून ही घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र, अधिकृत पुष्टी अद्याप मिळालेली नाही. एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाल्याने तिवळी गावासह संपूर्ण मालेगाव तालुक्यात शोककळा पसरली आहे.

# दुर्गराज रायगडावर शिवमय वातावरणात 'मराठा समाज : चिंतनातून चिंतामुक्तीकडे' पुस्तकाचा भव्य वितरण शुभारंभ

## लाखो शिवभक्तांच्या उपस्थितीत सामाजिक, आर्थिक आणि वैचारिक प्रबोधनाचा संदेश

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**रायगड :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ३५२ व्या वर्धापनदिनानिमित्त दुर्गराज रायगडावर लाखो शिवभक्त, दुर्गप्रेमी आणि शिवप्रेमींच्या उपस्थितीत शिवमय वातावरण निर्माण झाले असताना, याच ऐतिहासिक दिवशी 'मराठा समाज : चिंतनातून चिंतामुक्तीकडे – मराठ्यांचा व्यावसायिक दृष्टिकोन' या प्रेरणादायी पुस्तकाच्या वितरण शुभारंभाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मराठा उद्योजक परिवार, साईवेद प्रकाशन आणि शिवसूर्य सह्याद्री (महाराष्ट्र राज्य) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या विशेष उपक्रमाने रायगडावरील शिवराज्याभिषेक सोहळ्याला एक वैचारिक आणि सामाजिक परिमाण प्राप्त करून दिले. किल्ले रायगड तसेच पायथ्याशी उभारण्यात आलेल्या विशेष स्टॉलमधून हजारो शिवप्रेमींना पुस्तकाची माहिती देण्यात आली. समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने पुस्तकाचे वितरण करण्यात आले.

पुस्तकाचे लेखक कैलासराव तुरकणे-पाटील यांनी मराठा समाजासमोरील विविध आव्हानांचा अभ्यास करून उद्योजकता, आत्मनिर्भरता, संघटनशक्ती आणि आर्थिक प्रगतीचा मार्ग या पुस्तकातून मांडला आहे.



**मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांनी मराठा समाजासाठीच्या या साहित्याची मागणी केल्यानंतर वैभव तुरकणे पाटील यांनी त्यांना पुस्तकाची प्रत सस्नेह भेट दिली. पुस्तक वाचल्यानंतर पुन्हा चर्चेसाठी बोलावतो, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.**

शिवरायांच्या स्वराज्याच्या प्रेरणेने आधुनिक काळातील समाजाने आर्थिक स्वराज्याचा मार्ग स्वीकारावा, हा संदेश या पुस्तकातून देण्यात आला आहे.

उपस्थित शिवभक्त, तरुण, उद्योजक, विद्यार्थी आणि समाजहिताची जाणीव असलेल्या नागरिकांनी पुस्तकाबाबत विशेष उत्सुकता दर्शविली. स्वयंसेवकांनी माहितीपत्रके, हँडबिल आणि पुस्तकाविषयी मार्गदर्शन करून व्यापक जनजागृती केली. अनेकांनी पुस्तक खरेदी करून या उपक्रमाला प्रतिसाद दिला.

या प्रसंगी लेखक कैलासराव तुरकणे-पाटील, प्रा. निलेश घोलप, प्रशांत आहेर, शांतीनाथ विखे, विजय विखे, डॉ. राहुल सलालकर, प्रा. बाळासाहेब जाधव, प्रा. सुदेश थोरात, चंद्रकांत लबडे महाराज, प्रणित फटांगरे, वैभव तुरकणे, प्रतिक तुरकणे, पुरुषोत्तम तुरकणे, संजय गमे तसेच मराठा उद्योजक लॉबीचे मराठवाडा प्रमुख राजेंद्र अवताडे पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुस्तकाच्या निर्मिती, मुद्रण आणि प्रकाशन प्रक्रियेत राष्ट्र सह्याद्रीचे संपादक तथा साईवेद प्रकाशनाचे संचालक करण नवले, सौरभ घोगरे आणि विकास तांबे यांचे विशेष सहकार्य लाभले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यरत सर्व स्वयंसेवकांचे मान्यवरांनी अभिनंदन केले.

(पान ४ वर)

# चारित्र्याचा निकष नेमका कोणता?

विशेष संपादकीय

करण नवले
संपादक

भारतीय समाजात चारित्र्य हा शब्द अनेकदा नैतिकतेपेक्षा नियंत्रणाचे साधन म्हणून वापरला गेला आहे. विशेषतः स्त्री-पुरुष संबंध, विवाहपूर्व लैंगिक संबंध किंवा वैयक्तिक जीवनातील निवडी यांच्या संदर्भात चारित्र्याचे निकष ठरवले गेले. मात्र सार्वजनिक जीवनातील प्रामाणिकपणा, भ्रष्टाचार, फसवणूक, हिंसा किंवा सामाजिक जबाबदारी या बाबींकडे अनेकदा दुर्लक्ष करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने अलीकडे दिलेल्या एका महत्त्वपूर्ण निकालाने या दुटप्पी सामाजिक मानसिकतेवर बोट ठेवले आहे.

परस्परसंमतीने विवाहपूर्व शारीरिक संबंध ठेवणाऱ्या प्रौढ व्यक्तींचे चारित्र्य संशयास्पद मानता येणार नाही, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने तेलंगणातील एका पोलीस शिपायाच्या भरतीचा मार्ग मोकळा केला. हा निकाल केवळ एका उमेदवाराच्या न्यायासाठी दिलेला नाही, तर बदलत्या भारतीय समाजाच्या वास्तवाला मान्यता देणारा आहे.

या प्रकरणात संबंधित तरुणाचे एका महिलेशी दीर्घकाळ प्रेमसंबंध होते. विवाहाचे आश्वासन पूर्ण झाले नाही आणि त्यानंतर त्याच्यावर फसवणूक व धमकीचे आरोप करण्यात आले. पुढे हे प्रकरण लोकअदालतीत तडजोडीने निकाली निघाले. भरती प्रक्रियेदरम्यान त्याने ही माहिती प्रामाणिकपणे सादर केली. मात्र भरती मंडळाने त्याचा अर्थ चारित्र्यदोष असा लावत त्याची निवड रद्द केली. सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय उलटवत महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले की, एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्यातील परस्परसंमतीने झालेले संबंध आणि सार्वजनिक सेवेसाठी आवश्यक असलेले चारित्र्य हे दोन वेगळे विषय आहेत.

हा मुद्दा भारतीय समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण आपण चारित्र्याचा अर्थ अनेकदा चुकीच्या चौकटीत शोधत आलो आहोत. एखादी व्यक्ती नियमित पूजा करते, धार्मिक विधी पाळते, पारंपरिक जीवन जगते म्हणून ती प्रामाणिक असेलच असे नाही. त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीचे वैयक्तिक नातेसंबंध पारंपरिक चौकटीत बसत नाहीत म्हणून ती सार्वजनिक जीवनात अप्रामाणिक असेल, असेही मानता येत नाही.

आज देशासमोरचे मोठे प्रश्न कोणते आहेत? भ्रष्टाचार, आर्थिक घोटाळे, शैक्षणिक गैरव्यवहार, भेसळ, करचोरी, सायबर गुन्हे, अमली पदार्थांचे जाळे, महिला व बालकांवरील अत्याचार आणि सार्वजनिक निधीची लूट. या समस्यांमुळे समाजाचे मोठे नुकसान होते. परंतु या संदर्भातील नैतिकतेवर चर्चा करण्याऐवजी अनेकदा व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्यावर समाज अधिक लक्ष केंद्रित करतो. हीच मानसिकता सर्वोच्च न्यायालयाने अप्रत्यक्षपणे प्रश्नांकित केली आहे.

नुकत्याच घडलेल्या विविध घटनांकडे पाहिले तर समाजातील अनेक गंभीर गैरप्रकार उच्चशिक्षित, प्रतिष्ठित आणि सामाजिकदृष्ट्या स्वीकारार्ह समजल्या जाणाऱ्या लोकांकडूनच घडताना दिसतात. परीक्षा घोटाळे, आर्थिक फसवणूक, सरकारी भ्रष्टाचार किंवा आरोग्य क्षेत्रातील गैरव्यवहार यामध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींच्या वैयक्तिक नैतिकतेपेक्षा त्यांच्या सार्वजनिक वर्तनाचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो. कारण त्याचा परिणाम संपूर्ण समाजावर होत असतो.

सर्वोच्च न्यायालयाने या निकालातून आणखी एक वास्तव स्वीकारले आहे. आधुनिक भारतातील तरुण पिढीचे जीवनमान, प्राधान्यक्रम आणि नातेसंबंध बदलत आहेत. उच्च शिक्षण, करिअर, आर्थिक स्वावलंबन आणि जागतिक संपर्कामुळे विवाहाचे वय वाढत आहे. अनेक तरुण-तरुणी विवाहाआधी नातेसंबंध अनुभवत आहेत. काही जण विवाहाऐवजी सहजीवनाचा पर्याय स्वीकारत आहेत. काहींना विवाहसंस्थेची गरज वाटत नाही. या बदलांना नाकारून वास्तव बदलत नाही.

याचा अर्थ समाजातील सर्व मूल्ये बाद झाली आहेत, असा नाही. उलट जबाबदारी, परस्पर आदर, संमती आणि प्रामाणिकपणा ही मूल्ये अधिक महत्त्वाची ठरत आहेत. दोन प्रौढ व्यक्तींनी परस्परसंमतीने घेतलेल्या निर्णयांमध्ये राज्य, प्रशासन किंवा समाजाने कितपत हस्तक्षेप करावा, हा प्रश्न आज जगभर चर्चिला जात आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय या चर्चेला भारतीय संदर्भात एक स्पष्ट दिशा देतो.

भारतीय संस्कृतीचा वारसा केवळ रूढींच्या संरक्षणात नाही, तर काळानुसार बदल स्वीकारण्याच्या क्षमतेतही आहे. एकेकाळी ज्ञान, कला, तत्त्वज्ञान आणि मानवी नातेसंबंधांविषयी खुले विचार मांडणाऱ्या समाजाने कालांतराने अनेक प्रश्नांभोवती अनावश्यक भीती आणि संकोच निर्माण केले. आता त्या प्रश्नांकडे वास्तववादी दृष्टीने पाहण्याची वेळ आली आहे.

चारित्र्य म्हणजे केवळ लैंगिक जीवनातील शुद्धता नव्हे. चारित्र्य म्हणजे प्रामाणिकपणा, जबाबदारी, कर्तव्यनिष्ठा, सार्वजनिक हिताची जाणीव आणि कायद्याचा आदर. पोलीस, सैन्य, न्यायव्यवस्था किंवा प्रशासनात काम करणाऱ्या व्यक्तींसाठी हे निकष अधिक महत्त्वाचे आहेत. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील प्रत्येक निर्णयावर समाजाने न्यायासन मांडणे ही लोकशाही मूल्यांना साजेशी बाब नाही.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल भारतीय समाजाला एक महत्त्वाचा प्रश्न विचारतो आहे – आपण अजूनही व्यक्तीच्या खासगी आयुष्याला चारित्र्याचे मोजमाप मानणार आहोत की तिच्या सार्वजनिक वर्तनाला? या प्रश्नाचे उत्तरच भविष्यातील भारताची सामाजिक दिशा निश्चित करणार आहे.

# महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने राजमाता जिजाऊ एसटी बस उपयुक्त : आ. खताळ

## संगमनेरला पाच नवीन एसटी बसेस



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महा मंडळाच्या (एसटी) वतीने राजमाता जिजाऊ यांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या नवीन एसटी बसेसमध्ये विशेषतः महिला प्रवासी यांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस यंत्रणा तसेच इतर सुरक्षा सुविधांचा समावेश करण्यात आला या बसमधील सुविधा महिला सुरक्षेच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील, असा विश्वास आ. खताळ यांनी व्यक्त केला. महायुती सरकारच्या माध्यमातून संगमनेर आगाराच्या बळकटीकरणा साठी सातत्याने प्रयत्न सुरू असून, यापूर्वी आगाराला १५ नवीन एसटी बसेस प्राप्त झाल्या आहेत. त्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या कडे पाठपुरावा केल्यानंतर आणखी १० बसेस मंजूर करण्यात आल्या. त्यापैकी पहिल्या टप्प्यात पाच नवीन बसेस संगमनेर आगारात दाखल झाल्या आहेत.या बसेसचे लोकार्पण आमदार अमोल खताळ व आगार व्यवस्थापक प्रशांत गुंड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, एसटी महा मंडळाचे अधिकारी-कर्मचारी, प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. खताळ म्हणाले की, राज्यात काही काळ विकास प्रक्रियेला खीळ बसल्याने अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर विकासकामांना गती मिळाली असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

एसटी ही आजही सामान्य प्रवाशां साठी साठी परवडणारी व विश्वासार्ह सेवा आहे. त्यामुळे तिचे आधुनिकी करण काळाची गरज आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या माध्यमातून या नवीन एसटी बसेस उपलब्ध झाल्या आहेत, असे आमदार खताळ यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन मुरारी देशपांडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुस्ताक शेख यांनी मानले. नवीन बसेसच्या आगमनामुळे संगमनेर आगाराच्या सेवेत भर पडणार असून प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक प्रवासाचा लाभ मिळणार आहे.

**ग्रामीण भाग व विद्यार्थ्यांसाठीच बसेस**

संगमनेर आकारात आलेल्या नवीन राजमाता जिजाऊ बसेस संगमनेरच्या बाहेर न पाठवता संगमनेर तालुक्या तील ग्रामीण भागातील प्रवासी व विद्यार्थ्यांच्या सेवेसाठीच वापरण्यात येणार असल्याची माहिती संगमनेरचे आगार व्यवस्थापक प्रशांत गुंड यांनी प्रस्ताविकातून दिली.

कर्मचारी संख्या अपुरी आहे त्यामुळे अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अधिक ताण पडतो आहे. त्यामुळे लवकरात लवकर चालक, वाहक आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांची भरती तातडीने करण्यात यावी, अशी मागणी सेवानिवृत्त एसटी अधिकारी भगवान गीते यांनी केली.

# एमबीबीएस उत्तीर्ण तन्मय जगदाळेचा सन्मान



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल अमरनाथ ग्रुपच्या वतीने नेवासा येथील सदाशिवनगर येथील रहिवासी असलेल्या तन्मय दिलीप जगदाळेचा सन्मान करण्यात येऊन पुढील रुग्णसेवेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी झालेल्या सत्कार समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरनाथ ग्रुपचे मार्गदर्शक नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील हे होते तर तन्मयचे वडील दिलीप जगदाळे व आशाताई जगदाळे उपस्थित होते. यावेळी नंदकुमार पाटील यांच्या हस्ते तन्मय जगदाळे यांचा सन्मान बुके व शाल देऊन करण्यात आला.

यावेळी माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मण जगताप,ग्रुपचे सदस्य युनायटेड इन्शुरन्स कंपनीचे विकास अधिकारी किशोर गारुळे, रविंद्र जोशी, रामनाथ जाधव, व्यापारी शशिकांत नळकांडे, अंबादास ईरले, ज्ञानेश्वर उगले, बाळासाहेब नवले, राजेंद्र महाजन, शंकरराव ओहोळ, राजेंद्र उंदरे, शंभूराज जंगले, गणेश चौव्हान,नगरसेवक जालिंदर गवळी,ग्रुपचे सदस्य पत्रकार सुधीर चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर योगेश रासने यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# प्रवरासंगमला उभारलेल्या स्मशानभूमीचे आरगडे यांच्या हस्ते लोकार्पण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




सुधीर चव्हाण

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील टोका-प्रवरासंगम जायकवाडी धरणग्रस्त गावच्या लोकवर्गणीतून उभारण्यात आलेल्या स्मशानभूमीचे व अंत्यविधी रथाचे लोकार्पण बाबा आरगडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते बी के चव्हाण यांनी लोकवर्गणी गोळा करून परिश्रमातून सर्व सुविधा उपलब्ध असलेली व सुशोभीकरण केलेली स्मशानभूमी नूतनीकरण निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतला होता

प्रवरासंगम येथील गोदावरी नदीच्या तीरावर ही स्मशानभूमी उभारण्यात आली असून या आधी या स्मशानभूमीची अवस्था बिकट होती सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून सदरचे काम लोकसहभागातून करण्यात आल्याने आदर्शवत असे कार्य याठिकाणी झाले,स्मशानभूमी लोकार्पण कार्यक्रमात शव रथाचे ही लोकार्पण करण्यात आले.लोकार्पण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवरासंगम गावच्या सरपंच सौ.अर्चनाताई सुडके हया होत्या.

बाबा आरगडे, टोका सरपंच डावखर ग्रामपंचायत सदस्या गवळी, खेडले माजी सरपंच निर्मलाताई ढगे,जेष्ठ शिक्षक रामदास कोरडे उपस्थित होते. याप्रसंगी बाबा आरगडे, डॉ. अशोक ढगे, युवा नेते राजेंद्र कदम यांनी या सामाजिक कार्याचे आपल्या भाषणातून प्रशंसा केली

यावेळी आशाबाई चव्हाण व बी के चव्हाण यांच्या लग्नाचा वाढदिवस स्मशानभूमीत साजरा करून अंधश्रद्धेला छेद देण्यात आला. चव्हाण दाम्पत्याने लग्नाच्या ४४ व्या वाढदिवसानिमित्त अंत्यविधी रथ गावाला भेट दिला व याच स्मशानभूमीमध्ये केक कापून आपल्या लग्नाचा वाढदिवस साजरा केला.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य जगन्नाथ कोरडे, माजी सरपंच ईश्वरलाल बाकलीवाल, सुनीलराव बाकलीवाल, भारत गवळी, उद्योजक सुभाष दिघे, संदीप सुडके, सागर गाडेकर, रामभाऊ जाधव, राजेंद्र सुडके, प्रकाश पांडव, संजय जाधव, योगेश जाधव, स्वागत चव्हाण,स्वाती चव्हाण, सृष्टी चव्हाण,सहर्ष चव्हाण, सुवर्णा डावखर, मंदा मुळे, लता मुळे प्रणव आहेर, सचिन मुळे, अण्णा मुळे, रावसाहेब मुळे, ज्ञानेश्वर डावखर, उदय डावखर, रमेश काळे, सोनू फिरोदिया उपस्थित होते.

# संगमनेरच्या ग्रामीण भागात रुग्णांच्या जिवाशी खेळ

## अनेक मेडिकलमध्ये मुख्य फार्मासिस्ट 'गायब'!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**घारगाव :** संगमनेर तालुक्याच्या ग्रामीण भागात 'औषध निर्माण शास्त्र कायद्या'ची सर्रास पायमल्ली होत आहे. बहुतांश मेडिकल दुकानांमधून मुख्य फार्मासिस्ट गायब असून, अप्रशिक्षित व्यक्ती व नफेखोर मालकांकडून औषध विक्री केली जात आहे. यामुळे रुग्णांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

येथे एक नवा पॅटर्न समोर आला आहे. अनेक मालक स्वतः फार्मासिस्ट नसतात. ते बेरोजगार विद्यार्थ्यांच्या पदवीचा केवळ परवान्यासाठी वापर करतात आणि प्रत्यक्षात स्वतःच काउंटरवर बसून औषधे देतात. अनेक मूळ परवानाधारक मुंबई, पुण्यात नोकऱ्या करत आहेत, तर त्यांच्या अनुपस्थितीत त्यांचे 'पतीराज' किंवा नातेवाईक दुकाने चालवत आहेत. काही ठिकाणी तर वार्षिक भाडेतत्त्वावर परवाने घेतले आहेत.

कायद्यानुसार 'शेड्यूल एच' मधील कडक औषधे डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय देण्यास बंदी असतानाही येथे ती सर्रास विकली जात आहेत. कडक अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या काळात आता अचानक धाडी पडत असल्याने मेडिकल चालकांचे धाबे दणाणले.

मात्र, सध्या स्थानिक अधिकारी ग्रामीण भागाकडे फिरकतच नसल्याने पुन्हा 'सगळे अलबेल' सुरू आहे.

केवळ तपासणीपुरते फार्मासिस्ट हजर करणाऱ्या अशा बोगस मेडिकलचे परवाने रद्द करून मालकांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्वतः यात लक्ष घालून दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

**तपासणीची 'टीप' आधीच लीक...!**

औषध निरीक्षक जेव्हा तपासणीसाठी येतात, तेव्हा त्यांना हे दिसत नाही का? या प्रश्नामागील धक्कादायक वास्तव समोर आले आहे. औषध निरीक्षक येणार असल्याची 'टीप' औषध विक्रेत्यांना आधीच मिळते. अधिकारी पोहोचण्यापूर्वीच यंत्रणा सतर्क होते. मग ज्या फार्मासिस्टच्या नावावर लायसन्स आहे, त्याला केवळ त्या दिवसापुरते, तपासणीच्या वेळेपुरते तात्पुरते दुकानात हजर केले जाते. तपासणी पूर्ण होऊन अधिकारी निघून गेले, की पुन्हा 'पतीराज' आणि अप्रशिक्षित मालकांचेच राज्य सुरू होते. या 'अर्थ'पूर्ण साट्यालोट्यामुळेच ग्रामीण भागात नियम धाब्यावर बसवले गेले आहेत.

# प्रमोद मोरे यांचा 'पर्यावरणरत्न' पुरस्काराने सन्मान

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**श्रीरामपूर :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आणि स्वर्गीय 'वृक्षमित्र' आबासाहेब मोरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, 'निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य' आणि 'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर' यांच्या संयुक्त विद्यमाने राळेगणसिद्धी येथे राज्यस्तरीय पर्यावरण कार्यशाळेचे दिमाखदार आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत निसर्ग संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री प्रमोद मोरे यांना त्यांच्या प्रदीर्घ योगदानाबद्दल 'पर्यावरणरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पद्मभूषण ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अण्णासाहेब हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात पर्यावरण संरक्षण, जलसंधारण आणि सामाजिक प्रदूषण निवारण या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

स्व. वृक्षमित्र आबासाहेब मोरे यांनी लावलेल्या रोपवाटिकेतून आज एक विशाल वटवृक्ष निर्माण झाला आहे. या पवित्र कार्याचा वारसा प्रमोद मोरे अत्यंत समर्थपणे आणि निष्ठेने पुढे नेत आहेत. केवळ शब्दांत नव्हे, तर कृतीतून त्यांनी उभी केलेली पर्यावरण चळवळ आज संपूर्ण महाराष्ट्रात विस्तारली असून, हे मंडळ हरित क्रांतीचे एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि अथक परिश्रमांमुळे पर्यावरणाचा समतोल राखण्याचे कार्य यशस्वीपणे सुरू आहे. कार्यक्रम प्रसंगी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सेवानिवृत्त वनाधिकारी प्रभाकर म्हस्के, विशेष सरकारी वकील ड. सुरेश लगड, अहमदनगर माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड, प्रभाकर म्हस्के, छायाताई राजपूत, मंडळाचे कार्याध्यक्ष महेश पाडेकर तसेच मीनाक्षी मोरे, सचिव वनश्रीताई मोरे/गुणवरे, प्राचार्य डॉ. अनिल लोखंडे, प्रकाश केदारी यांच्यासह राज्यभरातील विविध पदाधिकारी, पर्यावरणप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, व मोठ्या संख्येने विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

# बेलवंडीतील हंगा नदीवरील पूल रखडला

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** बेलवंडी ते हंगा क्लास रस्त्यावरील हंगा नदीवर सुमारे दोन कोटी रुपये खर्चून बांधण्यात येत असलेल्या पुलाचे काम सध्या रेंगाळले आहे. एकीकडे पावसाळा तोंडावर आलेला असताना पुलाचे काम बंद असल्याने परिसरातील वाहतुकीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच, हा पूल मुख्य रस्त्याला जोडताना घेतलेले तीव्र आणि धोकादायक वळण भविष्यात मोठ्या अपघातांना निमंत्रण देणारे ठरणार असल्याने प्रवाशांमधून तीव्र चिंता आणि संताप व्यक्त केला जात आहे.पुलाच्या मुख्य कमानींचे बांधकाम बहुतांश पूर्ण झाले असून, बाजूचे भरावाचे काम अजूनही अपूर्ण आहे. मात्र, हा पूल मुख्य रस्त्याला जोडताना अभियंत्यांनी आणि ठेकेदाराने अत्यंत चुकीचे नियोजन केल्याचे समोर आले आहे. पुलाचा जोड रस्ता तयार करताना जागेवरच अत्यंत धोकादायक आणि तीव्र वळण देण्यात आला आहे. रात्रीच्या वेळी किंवा वेगात येणाऱ्या वाहनधारकांना या तीव्र वळणाचा अंदाज न आल्यास वाहने थेट नदीपात्रात किंवा पुलाच्या कठड्याला धडकून मोठा अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या धोकादायक वळणामुळे पूल फायद्याऐवजी जीवघेणा ठरेल, अशी भीती स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. अशा परिस्थितीत युद्धपातळीवर काम पूर्ण करणे गरजेचे असताना, सध्या प्रत्यक्ष जागेवर काम पूर्णपणे बंद असल्याचे चित्र आहे. याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी ठेकेदाराकडे विचारणा केली असता, शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्यामुळे काम थांबवले आहे.

# जामखेडमध्ये कोर्ट फी स्टॅम्पचा तुटवडा

## नागरिकांसह वकिलांची मोठी गैरसोय, कारवाईची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील सर्व मुद्रांक विक्रेत्यांनी कोर्ट फी स्टॅम्प, कोर्ट फी आणि तिकीट विक्रीस ठेवणे बंधनकारक असताना, सद्यस्थितीत त्यांची विक्री केली जात नसल्याने नागरिक आणि वकिलांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. या गंभीर समस्येविरोधात जामखेड येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील वकील अॅड. ऋषिकेश मोहनराव डुचे यांनी दुय्यम निबंधक तथा मुद्रांक निरीक्षक, जामखेड यांच्याकडे लेखी अर्जाद्वारे दाद मागितली आहे. तसेच संबंधित विक्रेत्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे.

तालुक्यातील मुद्रांक विक्रेते हे कोर्ट फी स्टॅम्प विक्रीसाठी तहसील अथवा कोर्ट आवारात ठेवत नसल्याचे समोर आले आहे. शासनाने या मुद्रांक विक्रेत्यांना योग्य तो नफा ठरवून दिला आहे, असे असतानाही केवळ परवडत नसल्याचे कारण पुढे करत विक्रेते स्टॅम्प ठेवत नाहीत. परिणामी, जामखेड येथील वकिलांना आणि पक्षकारांना जिल्हा स्तरावर कलेक्टर कचेरी अथवा जिल्हा कोर्ट सोसायटीमध्ये जाऊन स्टॅम्प विकत आणून काम चालवावे लागत आहे. यामुळे वेळ आणि पैसा दोन्हीचा मोठा अपव्यय होत आहे.

जामखेड तालुक्यातील सर्व मुद्रांक विक्रेत्यांना कोर्ट फी, कोर्ट फी स्टॅम्प (२८० रुपये), ५ रुपये आणि १० रुपये किमतीचे तिकीट विक्रीस ठेवण्याचे तात्काळ आदेश देण्यात यावेत. आदेश देऊनही ज्या विक्रेत्यांनी कोर्ट फी स्टॅम्प विक्रीस ठेवले नाहीत, त्यांच्यावर कायदेशीर आणि योग्य ती कडक कारवाई करण्यात यावी.
**अॅड. ऋषिकेश मोहनराव डुचे (जामखेड न्यायालय)**

कोणत्याही शासकीय कार्यालयात, तहसीलमध्ये किंवा न्यायालयात विविध अर्जांची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी कोर्ट फी स्टॅम्प वापरणे कायदेशीररीत्या गरजेचे असते. मात्र, जामखेड तहसील आणि कोर्ट परिसरात हे स्टॅम्प्स उपलब्ध होत नसल्याने सामान्य नागरिकांची मोठी कोंडी झाली आहे. शासनाचे नियम पायदळी तुडवणाऱ्या अशा विक्रेत्यांकडून प्रशासनाने तात्काळ लेखी खुलासा'मागवून घ्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या प्रकरणाची प्रत माहितीसाठी जिल्हा निबंधक वर्ग



१ तथा जिल्हा मुद्रांक अधिकारी, अहिल्यानगर यांनाही पाठवण्यात आली असून, आता जामखेडचे दुय्यम निबंधक प्रशासन या मुजोर मुद्रांक विक्रेत्यांवर काय पावले उचलणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय-कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादकः करण बाबासाहेब नवल RNI No. MAHM-R/2019/82605 www.rashtrasahyadri.com owner publisher Printer Kakasaheb Babasaheb Nawale To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur, Dist., Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: Karan Babasaheb Nawale RNI No M-HM-R/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmailD- rashtrasahyadrigmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

# झगडेफाटा ते रांजणगाव देशमुख रस्त्यासाठी पाठपुरावा करा

## आ. आशुतोष काळे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : ग्रामीण भागातील दळणवळणाचा दर्जा सुधारणे आणि शेतीसाठी पाण्याचे योग्य नियोजन करणे हीच शाश्वत विकासाची खरी गुरुकिल्ली असल्याने तालुक्यातील अनेक प्रलंबित कामांचे प्रस्ताव शासन दरबारी सादर केले आहे. यातील अतिशय महत्वाचा झगडे फाटा ते रांजणगाव देशमुख रस्ताच्या प्रस्ताव विविध योजनेंतर्गत दाखल केला असून हा प्रस्ताव मंजूर करण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करावा अशी मागणी आ. आशुतोष काळे यांनी अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे केली आहे.



अहिल्यानगर जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी शुक्रवार (दि.१२) रोजी कोपरगाव तालुक्यातील अंजनापूर गावात भेट दिली. यावेळी आ. आशुतोष काळे यांनी त्यांची भेट घेतली असता झगडे फाटा ते रांजणगाव देशमुख रस्ता (राज्य मार्ग क्रमांक ६५) रस्त्याचे काम होणे अत्यंत गरजेचे असल्याने या रस्त्याच्या कामाचा प्रस्ताव सीआरएफ, हॅम, एडीबी, एनडीपी, एआयबी कडे दिला असल्याबरोबरच केंद्रीय रस्ते मंत्री ना. नितीन गडकरी यांच्याकडे हा रस्ता राष्ट्रीय महामार्गात घेण्याची मागणी केली आहे.

आपण देखील या रस्त्याच्या कामासाठी विविध स्तरावर प्रयत्न करावे. तसेच अंजनापूर बंधारा क्रमांक ३ ते मंगलमूर्ती मंगल कार्यालय पर्यंत तसेच निळवंडे तळेगाव शाखा कालवा टेल ते खोकड विहीर पूर चारी अशा महत्वाच्या कामांचे प्रस्तावांवर शासनाकडे दाखल असून हे प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करण्यासाठी आपण देखील पाठपुरावा करावा. मी सातत्याने हे प्रस्ताव मंजूर होण्यासाठी पाठपुरावा करीत असून या रस्त्याच्या खराब रस्त्याच्या लांबी करिता बजेट मधून जास्तीतजास्त निधी उपलब्ध होऊन रस्त्याच्या कामाची वर्क ऑर्डर लवकरच प्रसिद्ध होणार असल्याची माहिती यावेळी आ. आशुतोष काळे यांनी दिली आहे.

झगडे फाटा ते रांजणगाव देशमुख या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक वाढली असल्याने या रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे अत्यंत गरजेचे असून या कामाचा प्रस्ताव सध्या शासन स्तरावर अंतिम मंजुरीच्या टप्प्यात आहे. ही मंजुरी लवकरात लवकर मिळावी. हे दोन्ही प्रस्ताव संपूर्ण परिसराच्या आर्थिक आणि शेतीविषयक प्रगतीला दिशा देणारे आहेत. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने देखील या प्रस्तावांना गती देणे अत्यंत गरजेचे असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले असता जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी प्रशाकीय पातळीवर प्रस्तावांचा पाठपुरावा करण्यासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, प्रांताधिकारी माणिकराव आहेर, तहसीलदार महेश सावंत, नायब तहसीलदार सौ. प्रफुल्लिता सातपुते, कोपरगाव नगरपरिषद मुख्याधिकारी सुहास जगताप, कृषी अधिकारी मनोज सोनवणे, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता डी. डी. पाटील, कोपरगाव ग्रामीणचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी, शिर्डीचे पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे, सरपंच सौ. कविता गव्हाणे यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पशुधन वाचविण्याचे आव्हान

## चारा व पाण्याअभावी पशुपालक चिंतेत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यात यंदा मान्सूनने अद्याप हजेरी लावलेली नसल्याने पशुपालकांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. जून महिना अर्धा संपत आला तरी पावसाचा एकही थेंब न पडल्याने विहिरी, बोअरवेल आणि लहान जलस्त्रोतांची पाणीपातळी झपाट्याने खालावत आहे. परिणामी जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासह हिरव्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये उन्हाळ्यापासूनच पाण्याची टंचाई जाणवत होती. मात्र जून महिन्यात मान्सूनच्या आगमनानंतर काहीसा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती. परंतु पावसाने दडी मारल्याने परिस्थिती अधिक बिकट बनली आहे. शेतकऱ्यांनी साठवून ठेवलेला चारा संपत आला असून हिरव्या चाऱ्याची उपलब्धता जवळपास शून्यावर पोहोचली आहे. त्यामुळे जनावरांच्या संगोपनाचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. दुग्धव्यवसायावर अवलंबून असलेल्या पशुपालकांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. चाऱ्याअभावी जनावरांचे आरोग्य खालावत असून दूध उत्पादनात घट होत आहे. यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. अनेक पशुपालकांना दूरवरून पाण्याच्या टाक्या किंवा टँकरच्या माध्यमातून जनावरांसाठी पाणी आणावे लागत असल्याने अतिरिक्त खर्चाचा भार सहन करावा लागत आहे.

पशुपालकांच्या मते, जून महिन्यातच अशी परिस्थिती निर्माण होणे चिंताजनक आहे. पुढील काही दिवसांत पाऊस न झाल्यास चारा छावण्या सुरू करण्याची वेळ येऊ शकते. तसेच जनावरांच्या आरोग्याची समस्या अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, प्रशासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन चारा डेपो सुरू करावेत, आवश्यक ठिकाणी पाण्याचे टँकर उपलब्ध करून द्यावेत तसेच पशुपालकांना तातडीची मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी व पशुपालकांकडून होत आहे. जनावरे हे शेतकऱ्यांचे महत्त्वाचे आर्थिक आधारस्तंभ असल्याने त्यांचे संरक्षण करणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. शेतकऱ्यांच्या संसाराचा आधार असलेले पशुधन आज चारा आणि पाण्याच्या अभावामुळे संकटात सापडले आहे. मान्सून लवकर दाखल होऊन समाधानकारक पाऊस झाल्यासच पशुपालकांना दिलासा मिळू शकणार आहे, अशी भावना तालुक्यातील पशुपालकांनी व्यक्त केली आहे.

सध्या श्रीरामपूर तालुक्यातील पशुपालकांचे लक्ष आकाशाकडे लागले असून, वेळेत पाऊस न झाल्यास पशुधन वाचविण्याचे मोठे आव्हान निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# आनंदगड पॉलिटेक्निक वीरगावला सुविधा केंद्राची मान्यता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गणोरे** : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी दहावीनंतर प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका (डिप्लोमा) तसेच बारावी विज्ञाननंतर द्वितीय वर्ष डिप्लोमा अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेसाठी आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज, वीरगाव यास सुविधा केंद्र (एफसी-५६६२) म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे.

तंत्र शिक्षण विभागाने प्रवेश प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक करण्यासाठी विकसित केलेल्या ऑनलाइन पोर्टलद्वारे प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, विद्यार्थ्यांना अर्ज भरणे, कागदपत्र पडताळणी व प्रवेशासंदर्भातील मार्गदर्शन या सुविधा या केंद्रातून उपलब्ध होणार आहेत.

तंत्र शिक्षण संचालनालय विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख व दर्जेदार तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबवत आहे. त्याचाच एक भाग म्हणून हे सुविधा केंद्र सुरू करण्यात आले आहे.

या केंद्राचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे यांनी केले आहे.

# रोहित पवारांच्या आंदोलनाला काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांचा पाठिंबा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसाठी आमदार रोहित पवार यांनी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. सरकारने या आंदोलनाकडे राजकीय चष्म्यातून न पाहता राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करून त्यांचा सातबारा कोरा करावा अशी मागणी करताना काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी रोहित पवार यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आमदार रोहित पवार यांनी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी याकरता अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.

या आंदोलनाला पाठिंबा देताना महाराष्ट्राचे माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे की, सरकारने या आंदोलनाकडे राजकीय चष्म्यातून पाहू नये. निवडणुकी काळामध्ये सरकारने कर्जमाफीच्या घोषणा केल्या होत्या. सरसकट कर्जमाफी करण्याचे आश्वासने दिली होती. दीड वर्ष उलटून गेल्यानंतरही कोणतीही कार्यवाही होत नाही. सध्या जाहीर केलेली कर्जमाफी ही अत्यंत तुटपुंजी आणि जाचक अटी असलेली आहे. याउलट महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये पहिल्याच कॅबिनेट बैठकीमध्ये दोन लाखापर्यंतची सरसकट कर्जमाफी व नियमित कर्ज फेडणाऱ्यांना ५० हजारांची अनुदान दिले होते. शेतकरी हा जगाचा पोशिंदा असून तो काय अडचणीत आहे. त्याला मदत करणे ही सरकारची पहिली जबाबदारी आहे. त्यामुळे सरकारने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे सरसकट कर्जमाफी जाहीर केली पाहिजे. याचबरोबर कर्जमाफी करून शेतकऱ्यांचा सातबारा पूर्णपणे कोरा केला पाहिजे. आ.रोहित पवार यांनी घेतलेल्या भूमिकेशी आपण सहमत असून सरकारने या विषयावर तातडीने आपली भूमिका स्पष्ट करणे गरजेचे आहे.

सरसकट कर्जमाफी शिवाय आता पर्याय नाही. हे सरकारने लक्षात घ्यावे असे आवाहनही त्यांनी केले आहे. याचबरोबर अलनिनोच्या संकटामुळे कमी पावसाची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे अत्यंत गरजेचे असून राजकारण बाजूला ठेवून सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी करून सातबारा कोरा करत दिलासा द्यावा अशी मागणीही त्यांनी केली आहे. व आ. रोहित पवार यांनी पंढरपूर येथे सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.

# पुणतांबाच्या शेतकऱ्यांचा भेसळ मुक्त अभियानाला जाहीर पाठिंबा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : अन्न व औषध आयुक्तपदी नुकतीच नियुक्ती झालेले तुकाराम मुंढे यांच्या भेसळ मुक्त महाराष्ट्र या अभियानाला शेतकरी संपाचे पुणतांबा गाव येथील शेतकऱ्यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. तुकाराम मुंढे यांनी संपूर्ण महाराष्ट्रात सुरू असलेल्या मोठमोठ्या चिलिंग प्लॅन मधील दूध भेसळीवर कायमस्वरूपी पाय बंद घालून महाराष्ट्रातील नागरिकांच्या आरोग्यासाठी भेसळमुक्त शुद्ध दुग्धजन्य पदार्थ देण्याच्या अभिमान सुरू केले आहे. त्याला पुणतांब्यातील शेतकऱ्यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला आहे तुकाराम मुंढे यांच्या अभियानामुळे शेतकऱ्याचे दूध आज ज्यादा दराने खरेदी होत आहे. १००% भेसळमुक्त जर महाराष्ट्र झाला तर याच दुधाला १०० ते १२० रुपये प्रति लिटर शेतकऱ्याला भाव मिळू शकतो. त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्यासह दुग्धजन्य पदार्थ व दूध विकत घेणाऱ्या जनतेचा तुकाराम मुंढे यांना भरघोस पाठिंबा मिळत आहे.



येणाऱ्या काळात सरकारकडून त्यांची बदली होऊ नये त्यामुळे प्रत्येक गावागावात शेतकरी पाठिंबा दर्शवत आहे. पुणतांबा येथील शेतकऱ्यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. यावेळी नवनाथ सोमासे, भगवान मोटकर, दीपक सोमासे, संजय परदेशी, गोटु सोमासे, सतीश टोपे, अमोल धनवटे, जाधव आसराबाई मतसागर सह अनेक जण होते.

# सखोल ज्ञान व योग्य व्यवस्थापनातून शेळीपालनात यश शक्य : डॉ. विठ्ठल विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : शेतीपूरक व्यवसायांचे परिपूर्ण ज्ञान घेऊन शेतकऱ्यांनी व्यवसायाकडे वळणे गरजेचे आहे. शेळीपालन व्यवसायामध्ये मोठ्या संधी उपलब्ध असल्या तरी त्यातील बारकावे समजून घेऊन शास्त्रोक्त पद्धतीने व्यवसाय केल्यास चांगले आर्थिक उत्पन्न मिळू शकते, असे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथील पशुविज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. विठ्ठल विखे यांनी केले.



पायरेन्स संस्थेच्या कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर यांच्या वतीने आयोजित दोन दिवसीय व्यावसायिक शेळीपालन प्रशिक्षण कार्यक्रमात ते मार्गदर्शन करत होते. डॉ. विखे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना शेळीपालन व्यवसायातील संधी, शेळ्यांचे विविध आजार, संतुलित आहार, चारा व्यवस्थापन तसेच उत्पादनक्षमता वाढविण्याच्या उपाययोजनांविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी राहाता पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी जगदीश खेडकर यांनी शासनाच्या विविध योजना, प्रकल्प आराखडा, शेळीपालनासाठी उपलब्ध अनुदाने, लसीकरण, गोठा व्यवस्थापन आणि रोगप्रतिबंधक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. शेळीपालन व्यवसायातून अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी सखोल तांत्रिक ज्ञान घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रशिक्षणादरम्यान तज्ज्ञांकडून शेळीपालन व्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि आर्थिक नियोजन याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात परिसरातील सुमारे ८० प्रशिक्षणार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

## द•ख•ल

### श्रीरामपूर तालुका राष्ट्रवादी किसान सभेच्या उपाध्यक्षपदी बंडोपंत बोडखे



**टाकळीभान** : श्रीरामपूर येथील काँग्रेस भवनात शुक्रवारी (दि. १२ जून) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभेचा शेतकरी व कार्यकर्ता मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी टाकळीभान येथील प्रगतशील शेतकरी बंडोपंत दिवाणजी बोडखे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभेच्या श्रीरामपूर तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. शेतकरी हितासाठी केलेल्या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविली. याचवेळी योगेश गंगाधर काळे यांची अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष तर रमेश केशव आव्हाड यांची जिल्हा संघटकपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव अविनाश आदिक, माजी आमदार लहू कानडे, माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक यांच्यासह पक्षाच्या विविध पदाधिकाऱ्यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमास किसान सभेचे प्रांताध्यक्ष ड. वसंतराव मनकर, राज्य सरचिटणीस अरुण पाटील नाईक, जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे, तालुकाध्यक्ष कैलास बोर्डे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### शिरसगाव येथे बिबट्याने गाईचा फडशा पाडला


**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव परिसरात बिबट्याचा वावर कायम असून शनिवारी पहाटे एका गायीवर हल्ला करून बिबट्याने तिचा फडशा पाडल्याची घटना घडली. या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिरसगाव येथील शेतकरी ज्ञानदेव नामदेव यादव यांच्या गीर जातीच्या कालवड गायीवर बिबट्याने हल्ला केला. हल्लयानंतर बिबट्याने गायीला जवळील शेतात ओढून नेले आणि तिचा फडशा पाडला. सकाळी ही बाब निदर्शनास आल्यानंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गेल्या दोन वर्षांपासून शिरसगाव परिसरात दोन बिबट्यांचा वावर आहे. या काळात अनेक शेळ्या, कुत्री तसेच इतर जनावरे बिबट्याच्या हल्लयात बळी पडली आहेत. मात्र, वारंवार मागणी करूनही वनविभागाकडून बिबट्यांना जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावण्यात आलेला नाही, अशी तक्रार नागरिकांनी केली आहे. शिरसगाव परिसराकडे वनविभागाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

### तहसीलदारांच्या कार्य तत्परतेमुळे पॉलिओग्रस्त बालकाला जीवदान



**नेवासा** : येथील तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांच्या कार्य तत्परतेमुळे नेवासा शहर मध्यमेश्वरनगर प्रभागातील पॉलिओग्रस्त सूरज लालचंद डोंगरे या सात वर्षीय अपंग बालकाला जीवदान मिळाले आहे. जमिनीवर सरपटत चालणारा हा बालक उपचारानंतर चालू लागला आहे, याबद्दल तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांचा बालकांच्या मातापित्यांनी सत्कार करून त्यांचे आभार मानले असून या बालकाला तहसीलदार यांनी डोल सुरू केल्याने मोठा आधार ही मिळाला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की मोलमजुरी कामाच्या निमित्ताने लालचंद डोंगरे व पुष्पा डोंगरे हे दाम्पत्य हे पुणे परिसरात आपली उपजीविका करत होते. त्यांचा सात वर्गीय पॉलिओ ग्रस्त मुलगा नेवासा येथे आजीकडे रहात होता. त्याचे शिधा पत्रिकेत नाव नसल्याने सूरज यास पुढील उपचार घेता येत नव्हते. ही बाब पत्रकार सुधीर चव्हाण यांनी तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांच्या कानावर घातली. तेव्हा त्यांनी लगेचच सुरजचे आजीच्या शिधापत्रिकेत नाव समाविष्ट केले, व वैद्यकीय सेवा मोफत मिळावी म्हणून लगेचच पत्र उपलब्ध करून दिले त्यामुळे लोणी येथील प्रवरा हॉस्पिटलमध्ये सूरजवर सुमारे दोन महिने मोफत उपचार करण्यात आले. आतापर्यंत जमिनीवर सरपटत जीवन जगत असलेल्या सूरजला उपचार घेत असतांना त्याच्या वडिलांनी घेतलेल्या सरावामुळे तो उभे राहून पाऊले टाकू लागला.याचे श्रेय सूरजच्या आईवडीलांनी तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांना दिले. आमची परिस्थिती हलाखीची असल्याने आम्हाला उपचार करणे शक्य नव्हते मात्र ते तहसीलदार डॉ.बिरादार साहेबांमुळे शक्य झाले असल्याचे सूरजचे वडील लालचंद डोंगरे यांनी सांगितले. तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांच्या या पुण्याच्या कार्याबद्दल त्यांचा तहसीलच्या दालनात सन्मान करण्यात आला.यावेळी प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण,महसुल अधिकारी अशोक गाडेकर,सुनील साळुंके,जनसेवक गणेश चौगुले सर, बालक सूरज डोंगरे,आई पुष्पा डोंगरे, वडील लालचंद डोंगरे उपस्थित होते. तहसीलदार डॉ.बिरादार यांच्या या तत्परतेने केलेल्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आत्मा मालिकने शैक्षणिक क्षेत्रात राज्यात ठसा उमटवला : नंदकुमार सुर्यवंशी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : समर्पण भावनेने ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या शिक्षकांमुळेच आत्मा मालिक शैक्षणिक संकुलाने राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला आहे. कला, क्रीडा, संगीत, नृत्य, अभिनय, स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, प्रवेश परीक्षा तसेच शालेय परीक्षांमध्ये आत्मा मालिकने राज्यस्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले असून, या यशामागे शिक्षकांच्या टीमवर्कचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी यांनी केले. विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टच्या आत्मा मालिक शैक्षणिक संकुलाच्या वतीने विविध क्षेत्रांत वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या ७४ शिक्षकांचा ज्ञानसाधना गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंत भोंगळे, खजिनदार विठ्ठल होन, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, प्रा. निरंजन डांगे यांच्यासह शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना सुर्यवंशी म्हणाले की, आत्मा मालिक शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांनी एनएमएमएस, शिष्यवृत्ती, नवोदय प्रवेश, ऑलिम्पियाड आदी स्पर्धात्मक परीक्षांमध्ये राज्यस्तरावर उल्लेखनीय यश मिळविले आहे.

अनेक विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवून संस्थेचा नावलौकिक वाढविला आहे. शिक्षकांची अथक मेहनत, विद्यार्थ्यांची शिस्त, ध्यान व आत्मचिंतनाची सवय यामुळेच हे यश शक्य झाले असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेच्या प्रगतीत शिक्षकांचे योगदान अनमोल असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### 'आत्मा मालिक पॅटर्न'ची राज्यभर चर्चा

आत्मा मालिक पॅटर्नचे यश राज्यातील शैक्षणिक विश्वात नेहमीच चर्चेचा विषय ठरले आहे. या यशामध्ये ज्ञानदान करणारे शिक्षक आणि ते आत्मसात करून यशासाठी परिश्रम घेणारे विद्यार्थी यांचा मोठा वाटा आहे. त्याचबरोबर येथील शैक्षणिक व अध्यात्मिक वातावरण विद्यार्थ्यांना सतत प्रेरणा देणारे ठरत असल्याचे मत संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी यांनी व्यक्त केले.

# सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालयात खेती बचाव अभियान संपन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या खेती बचाव अभियान कार्यक्रमांतर्गत माजी कृषीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालयात जमीन सुपीकता शाश्वत शेती याचबरोबर शेतकऱ्यांमध्ये जनजागृती बाबत विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत.



सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. एस बी खरबडे, डॉक्टर अण्णासाहेब शिंदे कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन नलावडे, कृषी कीटकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ कदम, प्राचार्य डॉ.राजेंद्र वाघ, डॉ रवी आंधळे, श्री सोनार , प्रबंधक प्रा जी.बी बाचकर प्रमोद देशमुख, सागर वाकचौरे आदी उपस्थित होते. गुंजाळवाडी येथे सुरू असलेल्या विश्व गौरव विभूषित परमपूज्य स्वामी गंगागिरी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहात या महाविद्यालयाने विविध शेतकऱ्यांना कृषी तंत्रज्ञानाच्या बाबत माहिती दिली आहे. यावेळी राजहंस दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख, दिलीपराव शिंदे, यांच्यासह विविध मान्यवरांनी भेट दिली.

# आम्ही साडेसातशे ढाप्यांचा हिशोब देतो

## विरोधकांनी ४ हजार कोटींचा विकास दाखवावा : नगराध्यक्ष पराग संधान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : विरोधकांनी मागील चार वर्षांत ज्या पद्धतीने कामं केलं, त्या पद्धतीने त्यांना सगळं दिसत आहे. त्यांनी जेवढी तत्परता या कामाच्या दरम्यान दाखवली, तेवढीच तत्परता त्यांनी ४००० कोटी रुपयांचा हिशोब द्यायला दाखवायला पाहिजे होती. मी स्वतः तसेच आमचे सर्व नगरसेवक शहरात बसविण्यात आलेल्या साडेसातशे ढाप्यांचा हिशोब देतो. आम्ही एक ना एक ढापा मोजून देण्यास तयार आहोत.मात्र विरोधकांनी ४००० कोटी रुपयांचा विकास जनतेला दाखवून द्यावा, आम्ही त्याबरोबर फिरण्यास तयार आहोत. त्यांनी आमच्याबरोबर फिरायची तयारी दाखवावी,असे खुले आव्हान नगराध्यक्ष पराग संधान यांनी विरोधकांना दिले.

ज्याला प्रामाणिकपणे काम करायचे आहे तो माणूस विरोधकांकडे कधीच लक्ष देत नाही. कोपरगावात त्यांचा पराभव होऊन सत्ता परिवर्तन झाल्याचे विरोधकांना सध्याही मान्य होत नसून, विरोधकांनी सहा वर्षांत केलेले काम पाहूनच कोपरगावच्या जनतेने त्यांना नाकारले आहे. डोंगर पोखरायचा आणि उंदीर काढायचा अशी गत विरोधकांची झाली आहे. विरोधकांच्या काहीच लागत नसून मात्र आम्ही आमचे तोंड उघडून पेन ड्राइव्ह दाखवले तर खूप काही मिळण्यासारखे आहे. विरोधक स्क्रिप्टेड पत्रकार परिषद घेतात. त्यांनी स्वतः पत्र दिले आहे. त्यांना माझे आजही आव्हान आहे, त्यांनी आत्ताच्या स्थितीत नगरपालिकेमध्ये यावे, मी त्यांना साडेसातशे ढापे पूर्ण मोजून दाखवायला तयार आहे.



यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये कुठलेही श्रेय घेतलेले नाही. नगरपालिकेच्या हद्दीमधील बंद पडलेली कामे पुन्हा सुरू केलेली आहेत.मला कुठलेही श्रेय घ्यायचे नाही, फक्त जनतेचे काम करायचे आहे. विरोधकांचा चष्मा पिवळा असल्यामुळे त्यांना प्रत्येक गोष्टीमध्ये राजकारण दिसत आहे. नगरपालिका हद्दीमध्ये आज स्वच्छ पाणी आलेले आहे आणि नागरिकांनी भारतीय जनता पार्टी व मित्रपक्षाच्या सर्व नगरसेवकांचे अभिनंदन केले आहे.

ज्यांना मिळालेले पत्र समजलेले नाही त्यांच्याशी काय बोलावे आणि ज्यांनी पत्र दिले त्यांना उत्तर मिळाले, त्यांनी त्यावर बोलले पाहिजे होते. कारण त्या पत्रात काय लिहिले आहे याची विस्तृत माहिती आम्ही लवकरच देणार आहोत. नगरपालिका कारभार ज्याला समजतो त्यालाच ते सांगण्यात अर्थ आहे.

कारण कोणतेही काम झाल्यानंतर त्याची बिले होतात, एमबी रेकॉर्ड होते आणि मग ते रेकॉर्डवर येते. आम्ही त्यांना सांगितले होते की जिथे मागणी येईल तिथे ढापे टाका. त्यानुसार प्रत्येक प्रभागात ढापे टाकण्यात आले आहेत. मध्ये काही काळ आचारसंहिता लागू असल्यामुळे सर्व कामे थांबली होती. लवकरच त्याची बिले होऊन साडेसातशे एक ना एक ढापा आम्ही मोजून देऊ, असेही नगराध्यक्ष पराग संधान यांनी स्पष्ट सांगितले.

# अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त 'सोनई ते चौंडी'दर्शन सोहळा

## राम शिंदे यांचा होणार सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती वर्षानिमित्त आणि अधिक मासानिमित्त सोनई ते चौंडी या विशेष दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी सेवा ट्रस्ट, सोनई आणि समस्त धनगर समाज बांधवांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत असून, महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मभूमी असलेल्या चौंडी येथे दर्शनासाठी भाविकांची यात्रा आयोजित करण्यात आली असून, समाजातील विविध घटकांचा या कार्यक्रमात सहभाग अपेक्षित आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करण्याबरोबरच त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा उद्देश या उपक्रमामागे असल्याचे आयोजकांनी सांगितले.

भारतीय इतिहासातील आदर्श, न्यायप्रिय आणि लोकाभिमुख राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर सोनई येथे आयोजित करण्यात आलेला हा दर्शन सोहळा विशेष महत्त्वाचा मानला जात आहे.

कार्यक्रमात विधान परिषद सभापती राम शिंदे यांच्या सामाजिक, राजकीय आणि विकासात्मक कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच उपस्थितांना अहिल्यादेवींच्या जीवनकार्याची माहिती देऊन युवकांनी त्यांच्या आदर्शातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन करण्यात येणार आहे.आयोजकांच्या मते, अशा उपक्रमांमुळे समाजामध्ये ऐतिहासिक वारशाबद्दल जागरूकता निर्माण होते, सामाजिक ऐक्याला चालना मिळते आणि विविध समाजघटकांमध्ये संवाद वाढण्यास मदत होते. चौंडी हे अहिल्यादेवींचे जन्मस्थान असल्याने या यात्रेमुळे भाविकांमध्ये इतिहासाबद्दल अभिमानाची भावना अधिक दृढ होणार आहे.

# सद्यस्थितीत घरपट्टी वाढवणे उचित नाही, जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे; आ. काळे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाने नागरिकांना वाढीव दराने घरपट्टी दिल्या आहेत. परंतु सद्याची परिस्थिती पाहता घरपट्टी वाढवणे उचित नाही. त्याबाबत आपण व्यक्तिश: लक्ष घालावे अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे केली. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी शुक्रवार (दि.१२) रोजी कोपरगाव तालुक्यातील अंजनापूर गावात भेट दिली यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी मतदार संघातील विकासाच्या विविध प्रलंबित प्रश्नाबरोबरच कोपरगावकरांच्या वाढीव घरपट्टीकडे जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.

ते म्हणाले की, कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाकडून कोपरगाव शहरातील नागरीकांची घरपट्टी वाढविणे प्रस्तावित होते. त्याबाबत असंख्य नागरीकांनी हरकती नोंदविल्या असून त्या हरकतींची अद्याप सुनावणी झालेली नसतांना अचानकपणे कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाकडून वाढीव दराने घरपट्ट्या देवून कर वसुली सुरु करण्यात आली आहे. सध्याची परिस्थिती पाहता महागाईचे प्रमाण मोठ्या प्रमणात वाढले असून नागरीकांना संसार प्रपंच करतांना प्रचंड ओढाताण करावी लागत आहे.

अशा परिस्थितीत कोपरगाव नगरपरिषदेने वाढव दराने घरपट्टी वसुली सुरु केल्यामुळे नागरीकांच्या अडचणी वाढणार आहेत. त्यामुळे एकूण परिस्थितीचा विचार करून वाढविण्यात आलेली घरपट्टी वाढ तूर्तास थांबवावी व त्याबाबत कोपरगाव नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास जगताप यांना सूचना द्याव्यात अशी मागणी केली. या मागणीला जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

### वाढीव घरपट्टी बाबत राष्ट्रवादीच्या नगरसेवकांचे निवेदन

वाढीव घरपट्टीच्या निर्णयासंदर्भात नगरपालिकेने विशेष सर्वसाधारण सभा बोलावण्याची मागणी राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी नगरपालिका उपमुख्याधिकारी मनोजकुमार पापडीवाल यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे. कोपरगाव नगरपरिषदेकडून अत्यंत चुकीच्या पद्धतीने घरपट्टी वाढ करण्यात आली असून याचा ज्येष्ठ नागरिक, मध्यमवर्गीय कुटुंब, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांवर वाढीव कराचा आर्थिक भार पडणार आहे. वाढीव घरपट्टी आणि मालमत्ता करासंदर्भात तातडीची विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात यावी. तसेच वाढीव घरपट्टीच्या निर्णयाचा पुनर्विचार करून कर आकारणीतील विसंगती व त्रुटींची सखोल निराकरण करावे. नागरिकांच्या हरकती व सूचनांचा विचार करावा आणि जुन्या कर आकारणी पद्धतीने घरपट्टी आकारणी करण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा असे निवेदनात म्हटले आहे.

# वादळाचा तडाखा; कोसळलेले वीज खांब व तुटलेल्या तारा तातडीने दुरुस्त करा : आ.विवेक कोल्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : तालुक्यात अचानक झालेल्या वादळी पावसात अनेक ठिकाणी विजेचे खांब जमिनीवर कोसळून ठिकठिकाणी विद्युत वाहक तारा तुटल्या असून,यामुळे समस्त शेतकरी बांधवांसह नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. संबंधित गावांमध्ये महावितरणच्या कर्मचाऱ्यांना तातडीने पाठवून विद्युत वाहक तारांची दुरुस्ती करावी तसेच नवीन वीज खांब उभारावेत, अशी मागणी आ.विवेक कोल्हे यांनी संगमनेर येथील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंत्यांकडे केली आहे.

आमदार विवेक कोल्हे यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंत्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, कोपरगाव तालुक्यात दिनांक ६ जून २०२६ रोजी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे रवंदे, दहेगाव बोलका, खिर्डी गणेश,चासनळी यांसह संबंधित भागातील सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या अनेक गावांमधील वीज खांब व विद्युत वाहक तारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



कोपरगाव तालुक्यातील शेतकरी बांधव व नागरिकांना वेळेवर वीजपुरवठा होत नसून अनेक ठिकाणी दिवसा-रात्रीच्या वेळी वीज पुरवठा खंडित झाल्याने जनावरांच्या पाण्याची तसेच पिण्याच्या पाण्याची गंभीर अडचण निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित भागातील शेतकरी व नागरिकांनी माझ्याकडे विद्युत वाहक तारांची दुरुस्ती करून नवीन वीज खांब बसवून देण्याची मागणी केली असल्याचे आमदार कोल्हे यांनी पत्रात नमूद केले आहे.

कोपरगाव तालुक्यातील रवंदे, दहेगाव बोलका, खिर्डी गणेश, चासनळी यांसह संबंधित भागातील सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावांमधील विद्युत वाहक तारा व वीज खांबांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत आपल्या स्तरावरून संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेस आवश्यक त्या सूचना व आदेश देण्यात यावेत, अशी विनंती आ. विवेक कोल्हे यांनी कार्यकारी अभियंत्यांकडे केली आहे.

**CHANGE OF NAME**

I Have Change My Old Name **Abdul Jabbar Usman Shaikh** And **A Jabbar Usman Shaikh** To New Name As **Jabbar Usman Shaikh** Vide Aadhar No.2593 6489 0831

# महावितरण कंपनीच्या श्रीरामपूर कार्यालयाकडून ग्राहकांचा छळ

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री


**श्रीरामपूर** : मान्सूनपूर्व देखभाल, दुरूस्तीचे पूर्वनियोजित कामे सकाळच्या सत्रात करण्याबाबत महावितरण कंपनीच्या मुख्य कार्यालयाकडून क्षेत्रीय कार्यालयास देण्यात आलेल्या निर्देशाचे श्रीरामपूर कार्यालयाला वावडे झाले आहे. देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली दिवस - दिवस आणि उन्हाळ्याच्या तडाख्यात कंपनीच्या श्रीरामपूर कार्यालयाने नागरिकांचा छळ सुरू केला आहे. उन्हाळ्यात विजेच्या वाढत्या मागणीच्या कालावधीत आणि पावसाळी परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून वीज यंत्रणेशी संबंधित विविध देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे सध्या वेगात सुरु आहे.

मात्र उन्हाच्या तडाख्यात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी ही कामे संबंधित दिवशी सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करावेत, असे निर्देश मुख्यालयाकडून क्षेत्रीय कार्यालयांना (दि. २५ एप्रिल २०२६) ला देण्यात आले आहे. मात्र महावितरणच्या श्रीरामपूर कार्यालयाने ते मनावर घेतले नाही. साधारणतः मे महिन्याच्या अखेरीस सर्व कामे पूर्णत्वास जातात. मात्र सद्यस्थितीत सकाळी १० ते दुपारी २ किंवा चार वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद ठेवत देखभाल व दुरुस्तीचे कामे सुरु आहेत.

महावितरणच्या देखभाल दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे करताना सर्वप्रथम प्राधान्याने पर्यायी वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याचे तसेच संबंधित वीजग्राहकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर 'एसएमएस'द्वारे तसेच प्रसिद्धी माध्यमांद्वारे कळविण्याचे निर्देश ही देण्यात आले आहे. मात्र अधिकाऱ्यांच्या बेफिकिरीमुळे नागरिकांना नाहक नको त्या संकटाशी सामना करावा लागत आहे. दरम्यान, महावितरण कंपनीच्या श्रीरामपूर कार्यालयाचे कार्यकारी अभियंता श्री. रजपूत यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्यानंतर त्यांनी सूचना करतो, असे सांगून वेळ मारून नेली आहे. तर या संदर्भात एका कर्मचाऱ्याशी संवाद साधला असता बाभळेश्वर येथे दुरुस्तीचे काम असल्याने वीज प्रवाह बंद करण्यात आल्याचे सांगण्यात आले. यावरून वितरण कंपनीचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये संवाद नसल्याचे चित्र समोर आले आहे. त्याची झळ मात्र सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या उदासीन ते बाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## निधन वार्ता

### जान्हवी पवार



**वळण** : राहुरी तालुक्यातील खुडसरगाव येथील जान्हवी नानासाहेब पवार (वय १७) हिचे अल्पशा आजाराने निधन झाले. पश्चात आई, वडील, चुलते, चुलती, दोन बहिणी, दोन भाऊ, आजी, मामा, आत्या असा मोठा परिवार आहेत. प्रगतशील शेतकरी नानासाहेब पवार यांची मुलगी तर, जिल्हा कॉंग्रेसचे सरचिटणीस शरद पवार यांची पुतणी होत.

# पान १ वरुन

### दुर्गराज रायगडावर शिवमय वातावरणात 'मराठा समाज : चितनातून चिंतामुक्तीकडे' पुस्तकाचा भव्य वितरण शुभारंभ

प्रक्रियेत राष्ट्र सह्याद्रीचे सपादक तथा साईवेद प्रकाशनाचे संचालक करण नवले, सौरभ घोगरे आणि विकास तांबे यांचे विशेष सहकार्य लाभले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यरत सर्व स्वयंसेवकांचे मान्यवरांनी अभिनंदन केले.शिवराज्याभिषेक दिनाच्या ऐतिहासिक सोहळ्यात सामाजिक प्रबोधनाचा संदेश देणारा हा उपक्रम विशेष ठरला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांतून प्रेरणा घेत समाजाला आर्थिक आणि वैचारिकदृष्ट्या सक्षम बनविण्याच्या दिशेने हे पुस्तक महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

पुस्तक मिळविण्यासाठी संपर्क करा :

इच्छुक वाचक, विद्यार्थी, उद्योजक आणि समाजहित चिंतकांनी पुस्तकाची प्रत मिळविण्यासाठी ८४८४८३०१११ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा https://www.sahakarstree.com या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### प्रसुतीत महिलेचा मुत्यू?

आरडाओरडा शिवीगाळ करत एकच धुडगूस घातला होता. त्यानंतर जमावातील काहीजण पुन्हा डॉ.मैड यांच्या हॉस्पीटलकडे आले.त्यांनी त्याठिकाणी येवून मैड हॉस्पीटल बाहेर असलेल्या इनोव्हा गाडीची तसेच मोटारसायकलची तोडफोड केली. शिवीगाळ, आरडाओरडा आणि तोडफोड यामुळे डॉक्टर आणि त्या ठिकाणीचे कर्मचारी भयभीत झाले होते.

दरम्यान, सदर घटनेची माहिती डॉक्टर लोकांना समजल्यावर घटनास्थळी डॉ. विनायक मोरगे, डॉ. पटारे, डॉ. समीर बडाख, डॉ. विनोद बागुल, डॉ. जयस्वाल, डॉ. बैरागी, डॉ. बधे, डॉ. कडू यांच्यासह अनेक डॉक्टरानंतर पोलीस स्टेशनला जमले.संतप्त जमावही पोलीस स्टेशनला आल्याने वातावरण तणावपूर्ण बनले.या प्रकारामुळे वैद्यकिय क्षेत्रात एकच खळबळ उडाली असून, श्रीरामपूर पोलीस स्टेशनचा पदभार असलेले स.पो.नि.गणेश जाधव हे या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

### वाढदिवसानिमित्त मंत्री विखे-पाटील यांची 'वहीतुला'

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेतील शिक्षक, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांसाठी वह्यांचे योगदान देत सामाजिक बांधिलकी जपली. यावेळी राधाकृष्ण विखे-पाटील यांची प्रतीकात्मक 'वहीतुला' करण्यात आली. साधेपणा आणि समाजोपयोगी उपक्रमातून वाढदिवस साजरा करण्याच्या या संकल्पनेचे उपस्थितांनी स्वागत केले.

कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे-पाटील, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे-पाटील, सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, उपसभापती अण्णासाहेब कडू, संचालक राहुल धावणे, मीनाक्षी निर्मळ, किशोर नावंदर, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, लीलावती सरोदे, डॉ. महेश खर्डे यांच्यासह विविध शाळा-महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याची भूमिका मंत्री विखे-पाटील यांनी सातत्याने मांडली आहे. वाढदिवसाचा कोणताही डामडौल न करता सामाजिक उपक्रम राबविण्याची परंपरा त्यांनी कायम ठेवली असून, यंदाही गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाला जिल्हाभरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

### पाण्याची आवर्तने तात्काळ बंद करा

शासन निर्णयाप्रमाणे कारवाईच्या कडक सुचनाही शासनाने परिपत्राकत दिल्या आहेत.

पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, सिंचन आवर्तने स्थगित करण्याबाबतची कार्यवाही व बेकायदेशिर पाणी उपसा रोखण्यासाठी करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल प्रत्येक आठवड्याला सादर करण्याच्या सुचना विभागीय आयुक्त, सर्व पाटबंधारे विकास महामंडळ, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी आधिकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आधिका-यांना देण्यात आल्या आहेत.

एल निनो म्हणजे विषुववृत्तीय पॅसिफिक महासागरातील समुद्राच्या पाण्याचे तापमान नेहमीपेक्षा जास्त वाढणे. याउलट ला निनो म्हणजे याच भागातील समुद्राचे तापमान नेहमीपेक्षा कमी होणे. एल निनो आणि ला निनो या उष्णकटिबंधीय पॅसिफिक महासागरातील नैसर्गिक हवामान प्रक्रियेचा भाग असून, त्यांचा जगभरातील हवामानावर मोठा परिणाम होतो. एल निनोमुळे अनेक देशांमध्ये पाऊस कमी होण्याची शक्यता असते, तर काही भागांत अतिवृष्टीही होऊ शकते.

### कर्जमाफीचा सरसकट लाभ दिल्याशिवाय माघार नाही

मंगळवारी मुंबईत एक विशेष बैठक लावण्याचे आश्वासन मंत्र्यांनी रोहित पवारांना दिले आहे.

सध्या कृषी मंत्र्यांकडून चर्चेच्या फेऱ्या सुरू असल्या तरी आमच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही. आंदोलनाची माहिती समजल्यानंतर आता मोठ्या प्रमाणात शेतकरी नेते देशभरातून पंढरपूरकडे येत असल्याची माहिती आहे. मनोजदादा जरांगे हे देखील आंदोलन स्थळी येणार असल्याची माहिती समजत असून अनेक कॉंग्रेसचे आणि इतर नेतेही येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

माझे वडील पत्नी आणि मुले खूप भाऊक झाली आहेत. वडील कालपासून येथे आंदोलनस्थळी आहेत. तर मुलं बाबा लवकर हे थांबवून घरी ये, असे निरोप देत आहेत. पण आता माघार नसल्याचे रोहित पवार म्हणाले. तुम्ही शक्तिपीठ महामार्गाला हजारो कोटी खर्च करताना शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या बाबतीत अटी कशाला? असा सवाल रोहित पवारांनी उपस्थित केला. जोपर्यंत कर्जमाफीमधील अटी काढून सर्वांना दोन लाख रुपयाची कर्जमाफी होत नाही, तोपर्यंत अन्नत्याग आंदोलन थांबणार नाही, अशी ठाम भूमिका रोहित पवारांनी व्यक्त केली. तसेच आम्हीही जिद्दी आहोत. जोपर्यंत कर्जमाफीमधील जाचकाठी निघत नाही आणि त्याचा फायदा सर्व शेतकऱ्यांना मिळत नाही, तोपर्यंत अन्नत्याग आंदोलन मागे घेणार नाही, असा इशारा रोहित पवारांनी दिला.

# यशवंतराव चव्हाण डेंटल कॉलेजच्या वतीने शेकडो वारकऱ्यांची दंत चिकित्सा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : अहिल्यानगर येथील यशवंतराव चव्हाण डेंटल कॉलेजच्या वतीने वद्य एकादशीचे औचित्य साधून नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर प्रांगणात घेतलेल्या दंत चिकित्सा शिबिरात शेकडो वारकऱ्यांची मोफत दंत चिकित्सा व मौखिक आरोग्य विषयक जनजागृती डॉ.कीर्ती आंधळकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी झालेल्या शिबीर प्रसंगी दर्शनासाठी आलेल्या वारकरी भाविकांना मौखिक आरोग्याच्या समस्या बाबत प्रबोधन करण्यात आले. दंत समस्या असलेल्या गरजूंना पुढील दंतविषयक उपचारांकरीता अहिल्यानगर येथील श्री. यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालय येथे येण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. तंदुरूस्त दातांसाठी योग्य पद्धतीने दातांची निगा राखण्यासाठी आवश्यक ती माहिती देऊन त्यांना मोफत टुथब्रश आणि टुथपेस्ट चे वाटप करण्यात आले.

डॉ.कीर्ती आंधळकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या दंत तपासणी शिबिरात समृद्धी आंबेडकर, सच्चिदानंद आंधळे, वेदांत अंधुरे, क्षितिज बनकर, मानसी भंडारी, प्रज्ञा भराटे, वैष्णवी भोजने, भावना भोसले, जुई ढोले, पायल डिसले, सानिका चहाड, सौ. सुनिता दातीर यांनी सहभाग नोंदवून मोलाची कामगिरी बजावली.

वारकऱ्यांची मोफत दंत चिकित्सा करून मार्गदर्शन केल्याबद्दल संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख मार्गदर्शक वेदांताचार्य हभप श्री देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री, विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, विश्वस्त ज्ञानेश्वर माऊली शिंदे, कृष्णाभाऊ पिसोटे, कैलास जाधव, जनसंपर्क अधिकारी भैय्या कावरे यांनी यशवंतराव चव्हाण डेंटल कॉलेजच्या टीमला धन्यवाद देत आभार मानले.

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

## नशिबाची परिक्षा

**रविवार दि.१४ जून २०२६**

| उदय-अस्त | | | सिंगल / जोड |
|---|---|---|---|
| **मिलनम डे** | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
| १४० २३० ३०० | ५-८ | १२५ १७० ११६ | जोड ७५-५१-४८-८०-९२ |
| **कल्याण** | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
| ३३० ४८० २२८ | २-४ | १४८ २८० ५३० | जोड ६२-२३-१४-४०-४९ |
| **मुंबैम (मेन)** | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
| १४६ ३२५ ८८० | १-२ | १३८ १२९ ११७ | जोड ७१-१३-६२-२४-३४ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

द•ख•ल

## सॉफ्टवेअर कंपनीच्या संचालकासह कर्मचाऱ्यांचे जामीन अर्ज फेटाळले

**अहिल्यानगर :** येथील सायबर पोलीस स्टेशन येथे दाखल असणाऱ्या सॉफ्टवेअर चोरी तसेच फसवणूक प्रकरणातील आरोपी शॉप मेटकंपनीचे संचालक मंदार पाथरीकर ,शैला केदार व पी आर एम कंपनीचे पूर्वीचे कर्मचारी मुकुंद दायमा व जालिंदर गमे यांचे अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा न्यायालयाने फेटाळण्याचे आदेश पारित केले. याबाबत सविस्तर वृत्त असे नितीन गोपालदास भराडीया या पी आर एम सॉफ्ट सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या धोरण अधिकाऱ्यांनी अहिल्यानगर येथील सायबर पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादी वरून सदरील आरोपी यांचे विरुद्ध सायबर पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता कलम ३ (५ )३१६ (४ )३१८( ४ )३३६ (३ )व माहिती तंत्रज्ञान अधिनियम चे कलम ४३ ६६ ६६ (व)७२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता सदरील फिर्यादीमध्ये सदरील आरोपी यांनी सर्वांनी संगणमताने सदरील भराडिया हे काम करत असलेल्या कंपनीचे की वर्ड व सोर्स कोड तसेच त्याच्या कॉपी करून संगणमताने त्या माध्यमातून नव्याने दुसरे सॉफ्टवेअर तयार केल्या संदर्भाच्या प्राथमिक माहितीचा आधारे त्यांनी फिर्याद दाखल केलेली होती सदरची फिर्याद दाखल झाल्यानंतर आरोपी मंदार पात्रीकर तसेच शैला केदार व पी आर एम कंपनीचे पूर्वीचे कर्मचारी जालिंदर गमे व मुकुंद दायमा यांनी अटकपूर्वक जामीन मिळण्यासाठी जिल्हा न्यायालयांमध्ये जामीन अर्ज दाखल केला होता प्रथमतः जिल्हा न्यायालयाने सदरचा जामीन अर्ज नामंजूर केला होता त्यानंतर सदरील आरोपी यांनी माननीय नामदार उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे देखील जामीन मिळणे साठी विनंती अर्ज केलेला होता सदरचा अर्ज माननीय नामदार उच्च न्यायालयाने पुन्हा जिल्हा न्यायालय अहमदनगर यांचेकडे फेर चौकशीसाठी पाठवलेला होता त्यावर अंतिमतः युक्तिवाद होऊन नव्याने जिल्हा न्यायाधीश श्री के एस कुलकर्णी यांनी आदेश पारित करून सदरील मूळ फिर्यादी पीआरएम कंपनीच्या वतीने विधीज्ञ गोरक्ष पालवे यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून सदरील अर्जदार आरोपी यांचे जामीन अर्ज नामंजूर करण्याचा आदेश पारित केलेला असून त्यांच्या अटकेची आवश्यकता असल्याची बाब आदेशामध्ये अधोरेखित केलेली आहे मूळ फिर्यादी पीआरएम शॉप मेट कंपनीच्या वतीने विधीज्ञ श्री गोरक्ष पालवे व विधिज्ञ श्री अमित टकले यांनी युक्तिवाद केला त्यांना एडवोकेट गुरविंदर पंजाबी सागर गरजे रोहित बुधवंत राहुल दहिफळे विशाल वांढेकर धनश्री खेतमाळीस रोहित चांडवले विवेक बडे पुष्कर बिडवाई प्रवीण निंबाळकर विवेकानंद बडे तेजस राख भक्ती तमनर बाळकृष्ण गीते यश केकान यांनी सहाय्य केले

## जागतिक योग दिनानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन

**अहिल्यानगर :** जागतिक योग दिनानिमित्त येथील योग विद्याधाम, कोहिनूर मॉल व श्रीपाद टॉईज यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य निबंध स्पर्धा आयोजित केली आहे. अशी माहिती योग्य विद्या धामचे अध्यक्ष डॉक्टर सुंदर गोरे यांनी दिली. या स्पर्धेसाठी मिडीया पार्टनर आय लव्ह नगर आहे. ही स्पर्धा खुला गट व शालेय गट अशा दोन गटांमध्ये घेतली जाणार आहे. खुल्या गटासाठी आत्म्याशी मैत्री करण्याचा मार्ग अष्टांग योग, आधुनिक जीवनशैली आणि योग साधना ,योग केवळ शारीरिक व्यायाम की जीवन पद्धती व योग- संस्कृतीकडून समृद्धीकडे आणि विज्ञानातून अध्यात्माकडे या विषयावर घेण्यात येणार आहे . तर शालेय गटासाठी निरोगी जीवनाची गुरुकिल्ली - योग, योगाभ्यासाचे आरोग्यासाठी महत्त्व व शालेय जीवनात योगाचे महत्त्व या विषयावर ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी शब्द मर्यादा ४०० ते १००० शब्द ठेवलेली आहे. मराठी हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये तुम्हाला निबंध लिहिता येतील . विजयी स्पर्धकांना प्रथम, द्वितीय,तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिके दिली जाणार आहेत. तसेच सहभागी स्पर्धकांना ही बक्षीसे दिले जाणार आहेत. स्पर्धकांनी आपले निबंध २० जून पर्यंत योग विद्या धाम कुष्ठधाम रोड , ज्ञानेश्वर ड्रायव्हिंग स्कूलच्या मागे, सावेडी येथे जमा करावेत. या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त लोकांनी व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आव्हान योग विद्या धाम चा पूजा गांधी यांनी केले आहे.

## बालहत्तेस प्रवृत्त केल्याच्या गुन्ह्यातील आरोपीला तात्काळ अटक करा : सकल हिंदू समाजाची मागणी



**शेवगाव :** बालहत्तेस प्रवृत्त केल्याच्या गुन्ह्यातील आरोपीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन आरोपीस तात्काळ अटक करावी. या मागणीसाठी शनिवारी सकल हिंदू समाजाच्या युवकांनी शेवगाव पोलीस ठाण्यात येऊन शेवगाव विभागीय पोलीस उपाधीक्षक नीरज राजगुरू, पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, शेवगाव तालुक्यातील अल्पवयीन हिंदू तरुणीने एका मुस्लिम युवकाकडून होत असलेल्या कथित त्रासाला कंटाळून गेल्या आठवड्यात आत्महत्या केल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडलेली आहे. संबंधित मुख्य आरोपी व त्यास मदत करणाऱ्या सहआरोपी या सर्वांवर सदोष मनुष्यवधाचा आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात यावा व आरोपीस तात्काळ अटक करून या रॅकेटचा खोलवर तपास करून पर्दापाश करावा. त्यांचेवर कठोरातील कठोर कारवाई व्हावी. अन्यथा सकल हिंदू समाजाच्यावतीने लोकशाही मार्गाने' हिंदू जनअक्रोश' मोर्चा काढण्यात येईल. या मोर्चामुळे होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी सर्वश्री प्रशासनाची राहील याची नोंद घ्यावी. यावेळी पोलिस ठाण्याच्या आवारात प्रचंड गर्दी उसळली होती.

## म्हसे-वडगाव शिंदोडी मार्गावर बिबट्याच्या पिल्लाचा वाहनधडकेत मृत्यू

**श्रीगोंदा :** म्हसे-वडगाव शिंदोडी रस्त्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्याच्या एका पिल्लाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. सकाळी मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या नागरिकांच्या निदर्शनास रस्त्यालगत बिबट्याचे पिल्लू मृत अवस्थेत आढळून आले.



घटनेची माहिती मिळताच प्रहार दिव्यांग संघटना श्रीगोंदा तालुका कार्याध्यक्ष अब्दुल सय्यद यांनी वनरक्षक बढे यांना दूरध्वनीद्वारे कळविले. त्यानंतर वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. वनविभागाने घटनास्थळाचा पंचनामा करून मृत बिबट्याच्या पिल्लाचा ताबा घेतला. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात आले असून त्यानंतर वनविभागाच्या नियमानुसार अंत्यविधी करण्यात आला. या वेळी रेंज फॉरेस्ट ऑफिसर दीपाली भगत, वनपाल रंजना घोडके, वनरक्षक दत्तात्रय बढे, संभाजी शिंदे, बाळासाहेब थोरात, रामभाऊ पळसकर यांच्यासह वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते. परिसरात बिबट्यांचा वावर असल्याने नागरिकांनी रात्रीच्या वेळी तसेच पहाटेच्या सुमारास अधिक सतर्कता बाळगावी, असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे. वाहनचालकांनीही वन्यजीवांच्या अधिवास परिसरातून जाताना वेगावर नियंत्रण ठेवण्याची गरज या घटनेमुळे अधोरेखित झाली आहे.

# रोहिणी मृग कोरडेच... खरीप पेरण्यांवर संकटाचे सावट!

## बाजरी-मूग- सोयाबीनच्या पेरण्यांवर संकटाचे सावट!

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**



**नगर तालुका :** रोहिणी नक्षत्र कोरडे गेल्यानंतर मृग नक्षत्रही संपत आले तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने नगर तालुक्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. खरीप हंगामासाठी आवश्यक असलेल्या पावसाअभावी बाजरी, मूग आणि सोयाबीनच्या पेरण्या धोक्यात आल्या असून बळीराजासमोर मोठे संकट उभे ठाकले आहे.

मान्सून वेळेत दाखल होईल आणि पेरण्यांना वेग येईल या आशेने शेतकऱ्यांनी मशागतीची कामे पूर्ण करून खरीप हंगामाची पूर्ण तयारी केली. मात्र जूनचा अर्धा महिना संपला तरी देखील पावसाने अद्यापही हजेरी न लावल्याने शेतकरी वर्ग चिंताग्रस्त झाला आहे. बळीराजा दररोज आकाशाकडे आशाळभूत नजरेने पाहत आहे. आर्द्रा नक्षत्रात तरी समाधानकारक पेरणी योग्य पाऊस पडेल या आशेवर बळीराजाची संपूर्ण भिस्त आर्द्रा नक्षत्रावर अवलंबून आहे.

८ जून रोजी मृग नक्षत्र लागले परंतु अद्यापही मृग नक्षत्र कोरडे गेले आहे. आर्द्रा नक्षत्र २२ जून रोजी लागत असून या नक्षत्रात पेरणी योग्य पाऊस झाल्यास खरीप हंगामातील पेरण्या होतील.अन्यथा पाऊस लांबल्यास खरीप हंगामाबाबत साशंकता निर्माण झाली आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात अथवा पंधरवड्यात बहुतांशी भागात मुगाची पेरणी उरकली जात असते. त्याचबरोबर बाजरी, सोयाबीनची ही पेरणी केली जाते. परंतु वरुणराजाने हुलकावणी दिल्याने पेरण्या खोळंबलेल्या आहेत.

आर्द्रा नक्षत्रातही पाऊस न झाल्यास मूग पेरणीचे नियोजन कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. उशिरा पेरणी झाल्यास उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असून आर्थिक फटका बसण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. तालुक्यातील प्रमुख खरीप पिके असलेल्या मुग, सोयाबीन आणि बाजरीवरही संकटाचे मळभ दाटले आहे. पावसाअभावी पेरण्या लांबल्या तर पीक उत्पादनावर परिणाम होऊन संपूर्ण खरीप हंगाम धोक्यात येऊ शकतो.

वाढलेला उत्पादन खर्च, महागडी बियाणे आणि खतांच्या दरांमुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही परिस्थिती अधिकच चिंताजनक ठरत आहे. बळीराजा आकाशाकडे डोळे लावून बसला असून आर्द्रा नक्षत्रात समाधानकारक पाऊस होईल अन् खरीप हंगामाची चिंता मिटेल याच अपेक्षेवर बळीराजा वरुणराजाच्या प्रतीक्षेत आहे.

> बळीराजा वादळ, दुष्काळ, पाऊस या संकटाशी नेहमीच लढा देत असतो. निसर्गाच्या लहरीपणाचा नेहमीच तालुक्यातील शेतकऱ्यांना फटका बसतो. आगामी नक्षत्रात समाधानकारक पाऊस झाला नाही तर शेतकऱ्यांचे नियोजन तसेच आर्थिक गणित कोलमडणार आहे.
>
> **दिगंबर गोरे (शेतकरी, जेऊर)**

## करपडी-शिंपोरा शिवरस्त्याचे यशस्वी सीमांकन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**लिंपणगाव :** तालुक्यातील करपडी-शिंपोरा शिवरस्त्याचे यशस्वी सीमांकन करण्यात आल्याने वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला मार्गाचा प्रश्न मार्गी लागला असून शेतकऱ्यांमध्ये बंधुभाव व समन्वयाचे वातावरण निर्माण झाले आहे. या कारवाईमुळे गावाच्या विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

कर्जतचे तहसीलदार रवी सातवण साहेब, नायब तहसीलदार कारंडे साहेब तसेच भूमी उपअधीक्षक अनंत पाटील साहेब यांच्या आदेशानुसार आणि शिवपानंद शेत रस्ते चळवळीचे मार्गदर्शक दादासाहेब जंगले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोजणी अधिकारी थोरात साहेब यांनी सदर शिवरस्त्याचे यशस्वी सीमांकन पूर्ण केले.

या कामासाठी करपडी गावचे *सरपंच युवराजभाऊ हाके यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून गावातील शेतकऱ्यांचा महत्त्वाचा प्रश्न निकाली निघाला आहे. कारवाईदरम्यान महसूल विभागाचे अधिकारी, तलाठी, मंडळ अधिकारी, पोलीस कॉन्स्टेबल पोकळे साहेब, तसेच नागेश कानगुडे, येताळ शेजाळ, दादा माने, तात्या पाहुणे आणि सरपंच युवराजभाऊ हाके यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

यावेळी शिवपानंद शेत रस्ते चळवळीच्या वतीने सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि शेतकरी बांधवांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

दादासाहेब जंगले पाटील यांनी सांगितले की, प्रशासन, ग्रामस्थ आणि शेतकरी यांनी समन्वयाने काम केल्यास महसूलमंत्र्यांनी शेतकरी हितासाठी घेतलेल्या शासन निर्णयाची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी होऊ शकते. अनेक पिढ्यांपासून शेतरस्त्यांसाठी संघर्ष करणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय मिळेल आणि गाव, तालुका तसेच राज्याच्या विकासाला गती मिळेल.

## जिल्ह्यात पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

### श्रीगोंदा पोलीस ठाण्यातही फेरबदल

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** अहिल्यानगर जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाच्या बैठकीनंतर जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या व नेमणुकांचे आदेश पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून जारी करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर येथून ११ जून २०२६ रोजी हे आदेश निर्गमित करण्यात आले असून प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेल्या या बदल्यांमध्ये श्रीगोंदा पोलीस ठाण्यासह विविध पोलीस ठाण्यांतील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ तसेच सुधारित तरतुदींनुसार या बदल्या करण्यात आल्या आहेत. श्रीगोंदा पोलीस ठाण्यात नवे अधिकारी, या आदेशानुसार राहुरी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक संजय राजाभाऊ टेंग यांची श्रीगोंदा पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. तर श्रीगोंदा पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक किरण बजरंग शिंदे यांची एफ.एस.टी.यू., अहमदनगर येथे नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्ह्यातील प्रमुख बदल्या पुढीलप्रमाणे : पोनि. जगदीश छबुराव भांगळ - तोफखाना पोलीस ठाणे ते नियंत्रण कक्ष, अहिल्यानगर, पोनि. रविंद्र नरसिंह देशमुख - नियंत्रण कक्ष, अहमदनगर ते राहुरी पोलीस ठाणे, पोनि. विलास महादू पुजारी - पाथर्डी पोलीस ठाणे ते मानव संसाधन विभाग, अहिल्यानगर, पोनि. संजय राजाभाऊ टेंग - राहुरी पोलीस ठाणे ते श्रीगोंदा पोलीस ठाणे, पोनि. किरण बजरंग शिंदे - श्रीगोंदा पोलीस ठाणे ते एफ.एस.टी.यू., अहिल्यानगर पोनि. नितीन भास्कर देशमुख - श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे ते कोतवाली पोलीस ठाणे, पोनि. आनंद अशोक कोकरे - मानव संसाधन विभाग ते पाथर्डी पोलीस ठाणे, पोनि. प्रताप पांडुरंग दराडे - नियंत्रण कक्ष ते नेवासा पोलीस ठाणे, पोनि. बाबासाहेब दादू बोरसे - शहर वाहतूक शाखा ते घारगाव पोलीस ठाणे, पोनि. मधु विष्णू पाटील - नियंत्रण कक्ष ते शहर वाहतूक शाखा, अहिल्यानगर, पोनि. दीपक पुंडलिक सराडे - नियंत्रण कक्ष ते राहाता पोलीस ठाणे, पोनि. बालाजी मदनराव वेध - एफ.एस.टी.यू. ते तोफखाना पोलीस ठाणे, पोनि. हनुमान लहाणू गायकवाड - नियंत्रण कक्ष ते कर्जत पोलीस ठाणे, तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि इतर अधिकाऱ्यांच्याही बदल्या करण्यात आल्या आहेत.

## महिलेचा विनयभंग; घरासमोर वस्तू टाकणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** येथील तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका २८ वर्षीय विवाहित महिलेचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मुन्सिपल कॉलनी परिसरातील सिद्धार्थ नगर येथे राहणाऱ्या पीडित महिलेच्या घरासमोरील मोकळ्या जागेत लज्जा उत्पन्न होईल अशी वस्तू टाकून तिचा विनयभंग करण्यात आला. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विनोद मधुकर त्रिभुवन, हर्ष सुनील शेलार आणि तनीष गोपाल गुजर (सर्व रा. मुन्सिपल कॉलनी, सिद्धार्थ नगर, अहिल्यानगर) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत.

पीडित महिला आपल्या कुटुंबासह रात्री घरात झोपलेली असताना आरोपींनी हे कृत्य केले. मुख्य आरोपी विनोद त्रिभुवन याच्या सांगण्यावरून हर्ष शेलार आणि तनीष गुजर यांनी पीडितेच्या घरासमोरील मोकळ्या जागेत एक मोरपंखी रंगाचा बॉक्स आणून टाकला. या बॉक्सला खाकी रंगाची चिकटपट्टी लावलेली होती.

त्या बॉक्समध्ये लज्जा उत्पन्न होईल असे अश्लील साहित्य ठेवून आरोपींनी महिलेचा विनयभंग केला. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर पीडितेने तात्काळ पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. तोफखाना पोलिसांनी याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ७९ आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला असून महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण या पुढील तपास करत आहेत.

## फेसबुकवर स्टेट बँकेचे 'योनो' ॲप सुरु करण्याच्या बहाण्याने महिलेची फसवणूक

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** फेसबुकवरील एका जाहिरातीच्या माध्यमातून स्टेट बँक ऑफ इंडियाचे 'योनो' मोबाईल प सुरू करून देण्याच्या बहाण्याने एका सेवानिवृत्त वृद्ध महिलेची २१ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात खातेधारकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सावेडी परिसरात बहिणीकडे आलेल्या ६९ वर्षीय सेवानिवृत्त महिला फिर्यादी यांनी फेसबुकवर बँक प सुरू करण्याची जाहिरात पाहिली होती. ते प मोबाईलमध्ये सुरू करायचे असल्याने त्यांनी ती जाहिरात डाऊनलोड केली. त्यानंतर आरोपीने त्यांना फोन करून बँक शाखेत जाण्याची गरज नाही, आम्ही घरबसल्या प सुरू करून देतो असे सांगितले. आरोपीने व्हॉट्सपद्वारे महिलेकडून बँकेचीगोपनीय माहिती मिळवली. माहिती मिळताच आरोपीने फिर्यादी यांच्या नाशिक आणि अहिल्यानगर येथील दोन वेगवेगळ्या बँक खात्यांमधून अनुक्रमे १२ हजार आणि ९ हजार रुपये असे एकूण २१ हजार रुपये परस्पर काढून घेतले. पैसे वजा झाल्याचे संदेश मोबाईलवर येताच महिलेला फसवणूक झाल्याचे समजले. त्यांनी तात्काळ राष्ट्रीय सायबर क्राईम पोर्टलवर तक्रार नोंदवली. चौकशीत ही रक्कम आरोपीच्या इंडसइंड बँकेच्या खात्यात वर्ग झाल्याचे समोर आले आहे. याप्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.



एक महत्त्वाची नोंद: आपण पत्रात तीन वेगवेगळे गुन्हे असा उल्लेख केला आहे, परंतु दिलेल्या कागदपत्रानुसार ही एकाच फिर्यादीची (महिलेची) एकाच वेळी दोन वेगवेगळ्या बँक खात्यांमधून झालेली २१,००० रुपयांची एकच सायबर फसवणूक आहे. तसेच आपल्या सूचनेनुसार बातमी साध्या मराठी भाषेत, इंग्रजी शब्द टाळून, आवश्यक नावांसह आणि मर्यादित ओळीत तयार केली आहे.

## तलवारीसह फिरणाऱ्या गुंडाला पोलिसांनी ठोकल्या बेड्या!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** तोफखाना पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध तपास पथकाने जुना बोल्हेगाव रोड परिसरातील नवीन पुलाजवळ सापळा रचून एका तरुणाला बेकायदेशीर तलवारीसह अटक केली आहे. सुमेध ऊर्फ टिंग्या किशोर साळवे (वय २९, रा. नीलक्रांती चौक, अहिल्यानगर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल भागवत मच्छिंद्र बांगर यांनी तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुना बोल्हेगाव रोडवर नवीन पुलाच्या पुढे एक इसम हिरवा शर्ट व निळी टोपी घालून, हातात तलवार घेऊन कोणता तरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने थांबला आहे, अशी गुप्त माहिती पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी गुन्हे शोध पथकाला तात्काळ कारवाईचे आदेश दिले. पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांनी दोन पंचांना सोबत घेऊन पथकासह खाजगी वाहनाने बातमीतील ठिकाणी छापा टाकला.

या छाप्यात पोलिसांनी संशयित आरोपी सुमेध ऊर्फ टिंग्या साळवे याला ताब्यात घेतले. पंचांसमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्याकडे एक हजार रुपये किमतीची २१ इंच लांबीची लोखंडी पाते असलेली धारदार तलवार मिळून आली. पोलिसांनी घटनास्थळीच लॅपटॉपच्या साहाय्याने पंचनामा करून तलवार जप्त केली. आरोपीविरुद्ध तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये आर्म ॲक्ट कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक थोरवे करत आहेत.

# लाडकी बहीण स्वावलंबी झाली पाहिजे : खा. नीलेश लंके

## ३७८ असंघटित बांधकाम कामगारांना ११ हजार रुपयांच्या किटचे वितरण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** राज्य शासनाच्या लाडकी बहीण योजनेमुळे महिलांना आर्थिक मदत मिळत असली तरी त्यांनी केवळ अनुदानावर अवलंबून न राहता स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. आमची लाडकी बहीण कोणावरही अवलंबून राहणारी नसून ती स्वतः कुटुंबाचा आधार बनली पाहिजे. त्यासाठी मतदारसंघात विविध स्वयंरोजगार व उद्योगाधारित योजना राबविण्यात येणार असून महिलांना दरमहा २५ ते ३० हजार रुपये उत्पन्न मिळवून देणाऱ्या प्रकल्पांची अंमलबजावणी केली जाईल, अशी घोषणा खासदार डॉ. नीलेश लंके यांनी केली.

असंघटित बांधकाम कामगारांसाठी शासनाच्या योजनेअंतर्गत ३७८ लाभार्थ्यांना भांडी व इतर जीवनावश्यक साहित्य असलेल्या सुमारे ११ हजार रुपये किमतीच्या किटचे वितरण गुरुवारी खासदार लंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना आरोग्यविषयक सुविधा तसेच आरोग्य कार्डचाही लाभ उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.



महिलांना घरबसल्या रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येणार असून महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या विक्रीची जबाबदारीही प्रतिष्ठान व संबंधित यंत्रणांकडून घेतली जाईल, असे खा. लंके यांनी स्पष्ट केले.

रूईछत्रपतीच्या माजी सरपंच अर्चना साबळे, शितल पोटे, रेश्मा मन्यार, सोनम पठारे आणि चंदू खेमनर यांनी असंघटित बांधकाम कामगारांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी मोठी मेहनत घेतल्याचे त्यांनी सांगितले. शासनाच्या योजना अस्तित्वात असल्या तरी माहितीअभावी किंवा प्रशासकीय अडचणींमुळे त्या अनेकदा गरजूंपर्यंत पोहोचत नाहीत. अशा परिस्थितीत पात्र लाभार्थी शोधून त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हे मोठे सामाजिक कार्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास सुदाम पवार, नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, उपनगराध्यक्षा सुप्रिया शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, जितेश सरडे, अभयसिंह नांगरे, विजय डोळ, सचिन पठारे, माजी नगराध्यक्ष नितीन अडसूळ, दिव्यांग संघटनेचे सुनील करंजुले, दीपक लंके, डॉ. सचिन औटी, प्रा. संजय लाकूडझोडे, राजेंद्र शेरकर, बलभीम कुबडे, अमित जाधव, सुभाष शिंदे, दादा शेटे, माजी सरपंच अर्चना साबळे, शितल पोटे, रेश्मा मन्यार, सोनम पठारे, चंदू खेमनर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते.

# कुंभमेळापूर्वी भीमाशंकर विकास आराखड्याचे ९० टक्के काम पूर्ण होणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** श्रीक्षेत्र भीमाशंकर हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक महत्त्वाचे ज्योतिर्लिंग असून या ठिकाणी देशभरातून भाविक भक्त येत असतात या ठिकाणी मंजूर झालेल्या विकास आराखड्यातील कामे कुंभमेळा सुरू होण्या अगोदर ९० टक्के पूर्ण करतील याचा विश्वास असल्याचे मत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी व्यक्त केले.

श्री क्षेत्र भीमाशंकर येथील विकास आराखड्याची पाहणी करण्यासाठी आले असता ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी राज्याचे माजी मंत्री दिलीप कोळसे पाटील, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, भोसरीच्या आमदार महेश लांडगे, खेडचे आमदार बाबाजी काळे यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले की श्रीक्षेत्र भीमाशंकर येथील मुख्य मंदिर, पायरी मार्ग, सभा मंडळ याचे काम गेल्या पाच महिन्यात युद्ध पातळीवर



करण्यात आले असून पीडब्ल्यूडी अधिकारी, जिल्हाधिकारी व त्यांची टीमच्या माध्यमातून काम चांगल्या दर्जाचे व वेगाने झाले आहे. मुख्य म्हणजे हे काम करत असताना स्थानिक गावच्या लोकांनी दाखवलेले सहकार्य महत्त्वाचे आहे या ठिकाणी असलेल्या दीडशे घरांचे स्थलांतर होणार असून त्यांच्यासाठी गाव वसवण्यात येणार असून हे गाव अतिशय सुंदर बनवण्यात येणार आहे भीमाशंकर येथे दर्शनासाठी आलेले भाविक हे या गावाला सुद्धा भेट देतील असे गाव बनवले जाईल तसेच भीमाशंकर कडे येण्या जाण्यासाठी आता स्वतंत्र रस्ते बनवण्यात येणार असून त्यामुळे वाहतूक कोंडी होणार नाही व्यापाऱ्यांची दुकाने व्यवस्थित मांडण्यात येतील. ज्येष्ठ नागरिकांसाठी इलेक्ट्रिक वाहनांची व्यवस्था केली जाईल कुंभमेळा सुरू होण्या अगोदर ९० टक्के काम पूर्ण होईल यासाठी प्रयत्न केला जाईल. हे काम करताना निसर्गाला कुठल्याही प्रकारचा धक्का न लावता काम करत एक नैसर्गिक कॉरिडॉल तयार होईल असा प्रयत्न आहे. भगवान शिव शंकराला प्रसन्न वातावरण आवडते त्यामुळे हा कॉरिडोर प्रसन्न वातावरणाचा होईल असे फडवणीस म्हणाले.

## दखल




### सिताबाई थिटे डी. फार्मसी येथे नेत्र तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

शिरुर: श्री छत्रपती संभाजी शिक्षण संस्थेच्या सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी (डी.फार्म.) राष्ट्रीय सेवा योजना युनिट तसेच आनंद ऋषीजी नेत्रालय व्हिजन सेंटर शिरूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १० जून रोजी जागतिक नेत्रदान दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये नेत्र तपासणी, मोतीबिंदू तपासणी, चष्म्याचा नंबर तपासणी तसेच विविध नेत्रविकारांचे निदान करून योग्य तो वैद्यकीय सल्ला देण्यात आला. मोतीबिंदूचे निदान झालेल्या रुग्णांना आनंद ऋषीजी हॉस्पिटल अहिल्यानगर येथे अल्पदरामध्ये मोतीबिंदूचे ऑपरेशन करण्याचा सल्ला देण्यात आला. यावेळी नेत्रतज्ञ श्री रोहित स्वामी व श्री संदीप पाडोळे यांनी नेत्रदानाचे महत्त्व त्याविषयीचे समज, गैरसमज व दृष्टीहीनांना नवजीवन देण्यासाठी नेत्रदानाची गरज याबाबत मार्गदर्शन केले. या शिबिरामध्ये डी.फार्मसी, बी. फार्मसी, नर्सिंग महाविद्यालयाचे तसेच विजयामाला स्कूल व ज्युनियर कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व नागरिक अशा एकूण १९७ जणांनी सहभाग नोंदविला.




### डुंबरवाडीत स्वामी भक्तांसाठी रुग्णवाहिका सेवेला प्रारंभ

डुंबरवाडी : श्री स्वामी समर्थ भक्ती शक्ती मंदिर सेवा समिती, डुंबरवाडी यांच्या वतीने ग्रामीण भागातील रुग्णांना अल्पदरात आणि तत्काळ आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न झाला. ह.भ.प. विठ्ठल महाराज शितोळे यांच्या प्रवचनाच्या भक्तिमय वातावरणात हा कार्यक्रम पार पडला. माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, ठाणे यांच्या सहकार्याने हा समाजोपयोगी उपक्रम साकारण्यात आला. रुग्णवाहिका व्यवस्थापनाची जबाबदारी सामाजिक कार्यकर्ते कैलास बोडके (खामुंडी) आणि एम.डी. ॲम्ब्युलन्सचे संस्थापक दिपक मंडलिक यांनी स्वीकारली आहे.रुग्णवाहिकेचे लोकार्पण लोकनियुक्त सरपंच शीतल गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वामी भक्त, ग्रामस्थ, देणगीदार आणि सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा उपक्रम ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनातून साकार झाला. त्यांच्या उदात्त विचारांमुळे आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहनामुळे हे कार्य पूर्णत्वास गेल्याची भावना सेवा समितीच्या सदस्या तथा सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी सुशीला डुंबरे यांनी व्यक्त केली.ग्रामीण भागातील नागरिकांना परवडणाऱ्या दरात रुग्णवाहिका सेवा उपलब्ध होणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

## जेजुरीच्या विकासासाठी सेंद्रिय हळद, भक्तनिवास व कॉरिडॉरची गरज : डॉ. नीलम गोऱ्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जेजुरी :** जेजुरी देवस्थानच्या प्रगती आणि विकासासाठी आपण अनेकदा विधानभवनात बैठका घेतल्या असून, श्रद्धेला धक्का न लावता सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे, असे प्रतिपादन शिवसेना नेत्या व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.

आज जेजुरी येथे डॉ. गोऱ्हे यांनी श्री खंडोबाची विधिवत पूजा करून दर्शन घेतले. खंडोबाने जसा दुष्ट शक्तींचा पराभव केला, तसेच सर्व नागरिकांना संकटांपासून संरक्षण मिळावे आणि महायुती सरकारच्या माध्यमातून जनहिताची कामे अधिक वेगाने पूर्ण होत राहावीत, अशी प्रार्थना त्यांनी श्री खंडोबाच्या चरणी केली. याप्रसंगी देवस्थानचे विश्वस्त ॲड. विश्वास पानसे यांनी डॉ. गोऱ्हे यांना शाल, श्रीफळ व खंडोबाची प्रतिमा देऊन सत्कार केला.



(छाया : मयुर कुदळे)

यावेळी पत्रकारांसोबत बोलताना डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, जेजुरीमध्ये पूर्वी अस्तित्वात असलेली मुरळी प्रथा बंद करण्यात मोठ्या प्रमाणात यश आले आहे. धर्म आणि परंपरा यांचा आदर राखत समाजसुधारणा करता येते, हा दृष्टिकोन ठेवून आम्ही काम केले. अनेकदा धर्म सोडल्याशिवाय प्रगती होऊ शकत नाही, असे म्हटले जाते; मात्र धर्मातील योग्य सुधारणा करूनही समाजाची प्रगती साधता येते. यासाठी सर्व समाजघटकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. जेजुरीतील भंडाऱ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या हळदीबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली. सेंद्रिय हळदीचा वापर वाढविण्यासाठी देवस्थानने पुढाकार घ्यावा आणि भाविकांना मोफत सेंद्रिय हळद उपलब्ध करून देता येईल का, याचा विचार करावा, असे त्यांनी सुचविले. राज्य सरकारच्या सेंद्रिय हळद संशोधन केंद्राच्या माध्यमातून शुद्ध हळद उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करता येतील, असेही त्यांनी सांगितले.देवस्थानच्या जमिनीचा प्रश्न सोडविण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे सांगत डॉ. गोऱ्हे यांनी जेजुरीच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. जेजुरीला येणाऱ्या लाखो भाविकांसाठी आधुनिक सुविधा असलेले भक्तनिवास उभारण्याची गरज असून, यासाठी स्थानिक नागरिक आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) यांनी संयुक्तपणे पुढाकार घ्यावा, असे त्या म्हणाल्या.वाराणसीच्या धर्तीवर जेजुरीमध्येही धार्मिक पर्यटनाला चालना देणारा कॉरिडॉर विकसित करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र अशा विकासकामांमध्ये स्थानिक नागरिकांचा सहभाग आणि विश्वास महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघाच्या शिरूर तालुका अध्यक्षपदी सागर रोकडे


प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाबळ :** महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघाच्या शिरूर तालुका कार्यकारिणीची बैठक नुकतीच शिरूर येथे पार पडली. या बैठकीत सागर रोकडे यांची तालुकाध्यक्ष, सुनील जिते यांची उपाध्यक्ष तर अर्जुन शेळके यांची कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी महासंघाचे राज्याध्यक्ष डॉ. समीर राजे यांनी पत्रकारांनी आर्थिक स्वावलंबन जपत निर्भीड पत्रकारिता करावी, असे आवाहन केले. पत्रकारांवर खोटे गुन्हे दाखल झाल्यास संघटनेने त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीस राज्य उपाध्यक्ष अरुणकुमार मोटे, जिल्हा उपाध्यक्ष तेजस फडके, जिल्हा संघटक साहेबराव लोखंडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.कार्यकारिणीत योगेश शेंडगे (सचिव), ओंकार भोरडे (खजिनदार), अक्षय टेमगिरे (संपर्कप्रमुख), किरण पिंगळे-शेलार (कोषाध्यक्ष), आबासाहेब थोरात (प्रसिद्धीप्रमुख), बाबा इनामदार (कार्यकारी समिती अध्यक्ष) व निलेश काळे (शहराध्यक्ष) यांची निवड करण्यात आली. पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी संघटना सक्रियपणे काम करेल, असा विश्वास नवनिर्वाचित अध्यक्ष सागर रोकडे यांनी व्यक्त केला.





### पारगाव परिसरात मद्यविक्रीवर उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारगाव :** परिसरात बेकायदेशीररीत्या विक्री करण्यात येणाऱ्या मद्यावर उत्पादन शुल्क विभागाने गुरुवारी (दि. १२) धडक कारवाई केली. या कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांनी विविध ठिकाणी छापे टाकून मोठ्या प्रमाणात मद्यसाठा व अन्य मुद्देमाल जप्त केला आहे.

उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी केलेल्या या मोहिमेमुळे परिसरातील बेकायदेशीर मद्यविक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत आणि कारवाईची सविस्तर माहिती अद्याप समोर आलेली नसली तरी विभागाकडून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, या कारवाईनंतर संबंधित विक्रेत्यांवर कठोर कायदेशीर कारवाई होणार की केवळ औपचारिकता पूर्ण करून त्यांना अभय दिले जाणार, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. बेकायदेशीर धंद्यांवर कायमस्वरूपी आळा बसण्यासाठी दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

उत्पादन शुल्क विभागाने केलेली ही कारवाई केवळ एकदिवसीय न राहता अशा बेकायदेशीर व्यवसायांवर सातत्याने धडक मोहीम राबविण्याची अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

### पावसाअभावी पूर्व आंबेगावातील शेतकरी संकटात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

लोणी धामणी : पूर्व आंबेगाव तालुक्यात यंदा मान्सूनचे आगमन लांबणीवर पडल्याने शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. जून महिना अर्ध्यावर येऊनही समाधानकारक पाऊस न झाल्याने दुष्काळग्रस्त भागातील शिरदाळे पहाडदरा लोणी वडगावपीर मांदळेवाडी आदी गावांमध्ये चाराटंचाई आणि पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होत आहे. जनावरांसाठी हिरवा चारा उपलब्ध नसल्याने पशु पालकांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

**चाराटंचाई व पिकांचे मोठे नुकसान**

दुसरीकडे, बागायती पट्ट्यातील अवसरी बुद्रुक, मेंगडेवाडी, जारकरवाडी, निरगुडसर, पोंदेवाडी, लाखणगाव, देवगाव, पारगाव शिंगवे, काठापूर बुद्रुक गावातील शेतकऱ्यांनी एप्रिल आणि मे महिन्यात मोठ्या आशेने भाजीपाला व तरकारी पिकांची लागवड केली होती. मात्र, अपेक्षित पाऊस न झाल्याने आणि वाढत्या उष्णतेमुळे ही पिके करपण्याच्या मार्गावर आहेत.अनेक ठिकाणी पिकांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून शेतकऱ्यांनी केलेला खर्च वाया जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.पाण्याअभावी विहिरी, बोअरवेल आणि जलस्रोतांची पातळी झपाट्याने खालावत असल्याने सिंचनासाठीही अडचणी निर्माण झाल्या आहेत.परिणामी, शेतकऱ्यांना पिके वाचवण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. पाऊस लवकर न झाल्यास खरीप हंगामावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.यंदाचा हंगाम वाया जातो की काय अशी चिंता शेतकऱ्यांच्या मनात घर करू लागली आहे. शेतकरी आता आकाशाकडे डोळे लावून बसला असून लवकरात लवकर दमदार पावसाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रशासनानेही परिस्थितीची दखल घेऊन संभाव्य चाराटंचाई व पाणीटंचाईवर उपाययोजना करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## बेकायदा ताडी विक्री प्रकरणी गुन्हा; ३३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** जुन्नर तालुक्यातील मढ गावात बेकायदेशीरपणे ताडी विक्री करणाऱ्या एका इसमावर ओतुर पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत ११० पिशव्या ताडी जप्त करण्यात आली असून आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १२ जून रोजी दुपारी १:२५ वाजता मढ(ता. जुन्नर )येथे अहील्यानगर-कल्याण



रस्त्यालगत असलेल्या आंब्याच्या झाडाच्या आडोशाला ही कारवाई करण्यात आली. पोलीस अंमलदार संपत भालेकर यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिस पथकाने छापा टाकला असून रविंद्र दशरथ भंडारी (वय ४०, रा. उदापुर, ता. जुन्नर) हा पांढऱ्या रंगाच्या गोणीत ताडीच्या पिशव्या बाळगून विक्री करण्याच्या तयारीत आढळून आला. त्याच्याकडून प्रत्येकी ३० रुपये किमतीच्या एकूण ११० प्लास्टिक पिशव्या, म्हणजेच ३३०० रुपये किमतीची ताडी जप्त करण्यात आली आरोपीविरुद्ध ओतुर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार बाळशीराम भवारी करीत आहेत.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक शुभम कुमार जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या सूचनेनुसार ओतुर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली आहे.

## जयगणेश रुग्णसेवा अभियान महाआरोग्य शिबिर, २३६६ मोफत शस्त्रक्रिया

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टच्या जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत महा आरोग्य शिबिरात २३६६ नागरिकांच्या मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

ट्रस्टच्यावतीने महा आरोग्य शिबीर दि.२३ मे २०२६ मध्ये आयोजित करण्यात आले होते. त्या शिबिरातील तपासणीत ज्यांच्यावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्याचे आढळले, त्या रुग्णांवर शस्त्रक्रिया मोफत करुन देण्यात आल्या. त्यात मोतीबिंदू, मणक्यावरील शस्त्रक्रिया, लहान मुलांवरील वेगवेगळ्या शस्त्रक्रिया, अस्थीरोगांवरील शस्त्रक्रिया, कॅन्सर आणि हृदय रोगावरील शस्त्रक्रिया यांचा समावेश आहे. याखेरीज दंत उपचार आणि डायलिसिस उपचारही मोफत करण्यात आले, अशी माहिती रासने यांनी पत्रकात दिली आहे. महाआरोग्य शिबिरात शस्त्रक्रिया आणि उपचारांसाठी एच.व्ही.देसाई नेत्र रुग्णालय, तेजोमयी आय केअर, सत्यसाई नेत्रालय, गॅलॅक्सी आय केअर, रेणुका नेत्रालय, ससून रुग्णालय, व्हीजन नेक्स्ट आय केअर, सूर्या सह्याद्री हॉस्पिटल, आय आय एम एस हॉस्पिटल, भारती हॉस्पिटल, जहांगीर हॉस्पिटल, सरदार वल्लभभाई पटेल हॉस्पिटल, ज्युपिटर हॉस्पिटल, सिल्व्हर बर्च हॉस्पिटल, देवयानी हॉस्पिटल, रुबी हॉल हॉस्पिटल, संचेती हॉस्पिटल, आदित्य बिर्ला हॉस्पिटल, कमला नेहरू रुग्णालय ही रुग्णालये आणि लायन्स क्लब कात्रज यांनी अभियानात भाग घेतला, असे रासने यांनी सांगितले.

## बारामती नगर परिषद सर्वसाधारण सभा संपन्न; ७७ पैकी ७५ विषयांना मंजुरी

सुरज देवकाते । राष्ट्र सह्याद्री

बारामती : बारामती नगर परिषदेच्या शरदचंद्रजी पवार सभागृहात शुक्रवारी (दि. १२) रोजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, मुख्याधिकारी तसेच सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत सर्वसाधारण सभा पार पडली. सभेमध्ये नागरिकांशी संबंधित विविध विकासकामांसह एकूण ७७ विषय सादर करण्यात आले. यापैकी ७५ विषयांना मंजुरी देण्यात आली, तर दोन विषयांना नामंजुरी देण्यात आली.

सभेच्या प्रारंभी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याविषयी करण्यात आलेल्या वक्तव्याचा सभागृहात जाहीर निषेध करण्यात आला. त्यानंतर विविध लोकहिताच्या विषयांवर नगरसेवकांनी चर्चा करत महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. संघमित्रा चौधरी यांनी अनुसूचित जाती-जमाती संदर्भातील विषय सभेपुढे मांडला. तांदुळवाडी येथील सायन्स पार्कच्या विषयास मंजुरी देताना जय पाटील व मनीषा चव्हाण यांनी भूमिका मांडली. बारामती नगरपरिषद शहरातील नॉनमीटर नळ कनेक्शनला मीटर बसवणे या संदर्भातील विषय जय पाटील यांनी हरकत घेतल्यामुळे तो विषय सभेमध्ये नामंजूर करण्यात



आला. गरुड बागेतील पार्किंग व्यवस्थेबाबत भारती शेळके यांनी प्रश्न उपस्थित केला. मालमत्ता करात दहा टक्के सवलत देण्याची मागणी जय पाटील, अमोल कावळे, संजय संघवी, निलेश इंगुले आणि आरती शेंडगे यांनी केली. नगरपरिषदेच्या गाळ्यांबाबत निलेश इंगुले यांनी प्रश्न उपस्थित केला, तर घरपट्टी कमीत कमी आकारण्यात यावी, अशी मागणी आरती शेंडगे यांनी केली. शास्ती माफ करण्याचा मुद्दा विष्णुपंत चौधर, सविता जाधव, सुनील सस्ते, प्रसाद खारतोडे आणि संजय संघवी यांनी मांडला. शहरात सर्व महापुरुषांचे पुतळे उभारण्यात यावेत, अशी मागणी नवनाथ बल्लाळ, अश्विनी सातव, प्रतिभा खरात आणि बिरजू मांढरे यांनी केली. वशिष्ठ पूर्ण योजनेअंतर्गत नमो उद्यान उभारण्याचा प्रस्ताव आरती शेंडगे यांनी मांडला. तीन हत्ती चौकाला 'तिरंगा सर्कल' असे संबोधण्यात यावे जळोची येथे भव्य गार्डन करण्यात यावे , टॉयलेटची फेरनिविदा काढावी, जळोची येथील श्रीराम नगर शाळेला २३ गुंठे बक्षीस पत्र दिल्यामुळे त्या शाळेला आजोबांचे नाव देण्यात यावे अशी मागणी अभिजात जाधव यांनी केली. मुस्लिम समाजासाठी बहुउद्देशीय सभागृह (शादीखाना) उभारण्याची मागणी आफरीन बागवान यांनी केली. शारदा प्रांगण येथील शाळा क्रमांक पाचची जुनी इमारत पाडून नवीन इमारत उभारण्याचा विषय अभिजीत चव्हाण व आरती शेंडगे यांनी मांडला. शहरातील विविध भागांत ओपन जिम उभारण्याची मागणी दर्शना तांबे, प्रतिभा खरात, मनीषा बनकर, शर्मिला ढवाण, पुनम चव्हाण, गणेश जोजारे, अनुप्रिता डांगे, गोरख पारसे, अमोल कावळे आदींनी केली . महिलांसाठी हिरकणी कक्ष आणि अत्याधुनिक स्वच्छतागृहे उभारण्याची मागणी अनुप्रिता डांगे, दर्शना तांबे, गणेश जोजारे, सोमनाथ गजाकस, विशाल हिंगणे, मंगल जगताप, धनश्री बांदल, मंगला किर्वे, रूपाली मलगुंडे आणि विनिता सातकर यांनी केली. अंतर्गत रस्त्यांच्या कामांबाबत राहुल वाघोलीकर यांनी प्रश्न उपस्थित केला. दलित वस्तीतील विकासकामांचा दर्जा निकृष्ट असल्याचा आरोप अभिजीत चव्हाण यांनी केला. तसेच प्रभागनिहाय सुरू असलेल्या व प्रलंबित कामांचा आढावा घेण्याची मागणी अमर धुमाळ यांनी केली.

बारामती शहरात स्वतंत्र हॉकर झोन उभारण्याचा मुद्दा गणेश जोजारे व राहुल वाघोलीकर यांनी उपस्थित केला. गणेश भाजी मंडईतील गाळेधारकांच्या समस्यांबाबत दर्शना तांबे व अल्ताफ सय्यद यांनी मुद्दा मांडला. फिरते विक्रेते व पदविक्रेते यांच्याकडून होणाऱ्या दैनिक वसुलीबाबत अमर धुमाळ यांनी सभेचे लक्ष वेधले. बुद्ध विहार तसेच विविध महापुरुषांच्या जयंती साजऱ्या होणाऱ्या ठिकाणांचे सुशोभीकरण करण्याची मागणी अविनाश निकाळजे यांनी केली. शारदानगर येथील शाळा व बस बारामती नगर परिषदेकडे वर्ग करण्याची मागणी राजेंद्र सोनवणे यांनी केली. विविध विकासकामे, कर सवलती आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित विषयांवर सविस्तर चर्चा करत सभेतील बहुतांश विषयांना मंजुरी देण्यात आली. शहराच्या विकासास गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

**वाढीव हद्दीतील रुई गावातील उघड्या गटारींचा प्रश्न ऐरणीवर..तसेच रुई परिसरात स्मशानभूमी उभारण्याचा मुद्दाही सभेत चर्चिला गेला. रुई गावातील उघड्या गटारी पावसाळ्यामुळे तुडुंब भरून वाहत असून परिसरात दुर्गंधी पसरत असल्याची गंभीर बाब संपदा चौधर यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिली. यावर तातडीने उपाययोजना करण्यात यावी, तसेच रुई येथील डांबरीकरणाचा रस्ता त्वरित मंजूर करावा, अशी मागणी त्यांनी केली. शहरातील ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करण्याचाही मुद्दा त्यांनी उपस्थित केला.**

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



# संरक्षण क्षेत्रात अहिल्यानगर टॉपवर

## शिर्डीत डिफेन्स हब, राहुरी तालुक्यात एमआयडीसी : पालकमंत्री राधाकृष्ण विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : देशात तीन ठिकाणी संरक्षण हब निर्माण केले जात आहे. त्यातील शिर्डी हे महत्त्वाचे संरक्षण हब असणार आहे. त्याचबरोबर अहिल्यानगर येथील डीआरडीओ संरक्षण संशोधन आणि विकास संस्था देखील त्यांच्या संशोधनाचा विस्तार करणार आहे. त्यासाठी त्यांनी शासनाकडे १००० एकर जागेची मागणी केली आहे. त्यांनाही शासन जागा देण्याच्या विचारात आहे. तसेच राहुरी तालुक्यात १६०० एकरवर नवीन औद्योगिक क्षेत्र निर्माण केले जाणार आहे. त्यासाठीचे जमीन संपादन पूर्ण झाले आहे.

अशी माहिती जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाच्या १२ वर्षाच्या यशस्वी कार्यकाळाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील बोलत होते. यावेळी भाजपाचे दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग,



उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक निखिल वारे, महेश लोंढे , विनायक देशमुख , विश्वनाथ कोरडे, मुकुल गंधे, उदय अनभुले उपस्थित होते. यावेळी बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम व दूरदर्शी नेतृत्वामुळे देशातील सामान्य माणूस विकासाच्या मुख्य प्रवाहात आला आहे. २५ कोटी लोक प्रत्यक्षात गरिबीच्या बाहेर आले असून, देशातील ८१ कोटी लोकांना अन्नसुरक्षा योजनेचा लाभ मिळाला आहे. केंद्र सरकारने नेहमीच शेतकरी हिताला प्राधान्य दिले असून, ११ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून ४.२७ लाख कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे.

किसान क्रेडिट कार्ड योजनेच्या माध्यमातून १०.२ लाख कोटी रुपयांचे वितरण झाले आहे. देशातील १२ कोटी कुटुंबांना आयुष्यमान भारत योजनेचा लाभ मिळाला असून, ५ लाख रुपयांपर्यंतच्या मोफत उपचारांचा यामध्ये समावेश आहे. ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांनाही या योजनेचा लाभ देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. देशातील अन्नधान्याच्या उत्पादनात ७० टक्के ही ऐतिहासिक वाढ झाली असून, अन्नदाता सक्षम आणि आत्मनिर्भर होण्याच्या दृष्टीने शासनाचे प्रयत्न आहेत.

दूध उत्पादनातही मागील १० वर्षांत ६९.४ टक्के वाढ झाली आहे. 'प्रत्येक थेंबातून अधिक पीक' यासाठी १०९ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यात आले असून, पाण्याच्या बचतीबरोबरच शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ झाली आहे. देशात आणि राज्यात नदीजोड प्रकल्पांना दिलेले प्राधान्य आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून अपूर्ण कामांना मिळालेली गती याचे सकारात्मक परिणाम पाहायला मिळत असल्याचे ना. विखे म्हणाले. देशात १.४६ लाख कि.मी. पर्यंतच्या महामार्गांची कामे, रेल्वेचे आधुनिकीकरण, देशामध्ये डिजिटल क्रांतीची सुरुवात झाली असून ६ कोटींहून अधिक लोक डिजिटल साक्षर झाले असून, युपीआय (णझख) व्यवहारांमध्ये १२ हजार पटींची वाढ झाली आहे.

डिजिटल पेमेंटच्या बाबतीत भारत देश आज जगात आघाडीवर आहे. पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वाखाली देशाची अर्थव्यवस्था लवकरच जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वासही मंत्री विखे यांनी व्यक्त केला.

### रोहित पवारांची चमकोगिरी

जलजीवन योजनेतील भ्रष्टाचाराच्या आरोपांवर भाष्य करताना मंत्री विखे म्हणाले रोहित पवार यांना कशाचीही माहिती नसताना ते केवळ चमकोगिरी करीत आहेत. सर्व ठेका त्यांनीच घेतला आहे का? त्यांच्या पक्षाचे अस्तित्व उरलेले नाही. त्यामुळे विलीनीकरण करून काय उपयोग, असा टोला मंत्री विखे यांनी लगावला.

# सोनेवाडी परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ

## एकाच रात्री तीन ठिकाणी चोऱ्या



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : तालुक्यातील सोनेवाडी परिसरात शुक्रवारी रात्री एक वाजता चोरट्यांनी धुमाकूळ घालत तब्बल तीन ठिकाणी रोख रक्कम व सोन्याचा ऐवज लंपास केला. सदर घटनेची माहिती मिळताच कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी , पोलीस कॉन्स्टेबल अनिस शेख घटनास्थळी दाखल झाले तीनही ठिकाणी परिस्थितीची पाहणी करत त्यांनी शिर्डीचे पोलीस उपाधीक्षक अमोल भारती यांना सदर घटनेची माहिती दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत भारती यांनी देखील घटनास्थळी भेट दिली. अहिल्यानगरचे न्याय वैद्यक पथक, तसेच तसेच तज्ञ यांची टीम देखील घटनास्थळी दाखल होत त्यांनी पुढील कारवाई केली. मध्यरात्री नऊ तरी परिसरात हिराबाई भास्कर माकोने यांच्या वस्तीवर चोरट्याने चोरी करत त्यांच्या गळ्यातील अर्धा तोळ्याचे डोरले हिसकावून घेतले. तर दुसऱ्या घटनेत अर्जुन विठ्ठल जावळे यांच्या वस्तीवर आपला मोर्चा वळवला मात्र वस्तीवरील नागरिकांना जागा आल्यानंतर मात्र त्यांनी घरात आलेल्या पाहुण्यांची पर्स पळून नेली. कविता अर्जुन जावळे यांचे पंधराशे रुपये व अर्ध्या ग्रॅम सोने याचा त्यात सहभाग आहे. तर गोरक्षनाथ रोड परिसरात अण्णासाहेब आमलुक जावळे यांच्या वस्तीवर या चोरट्यांनी आपला मोर्चा वळवला. सौ सविता जावळे बाहेर पोर्चमध्ये झोपलेल्या होत्या. त्यांना चोरटे आल्याची चाहूल लागली मात्र हातात कुऱ्हाडी व चौघे चोरटे असल्याने त्यांची बोलती बंद झाली. दोघांनी कुऱ्हाडीचा धाक दाखवत सविता जावळे यांना वेठीस धरले. व आत मध्ये प्रवेश करत जावळे यांच्या घरातील जवळपास दोन तोळे सोने व अर्धा भार चांदी चोरून नेली. एवढ्यावरच भागले नसल्याने त्यांनी त्यांच्या पायातील जोडवे काढायचा प्रयत्न केला मात्र ते काढण्यात त्यांना अपयश आले. कानातील कुडंक काढले. मात्र कानातील रिंगा या नकली असल्याचे समजून त्यांनी त्या तशाच सोडून दिल्या त्यामुळे त्यांचे तीन चार ग्रॅम सोने वाचले. सोनेवाडी येथे आखाडी उत्सव सुरू असल्याने रात्री किशोर जावळे यांना या संदर्भात फोन आला. त्यांनी तात्काळ पोलीस पाटील दगू गुडघे यांना संदर्भात माहिती दिली. पोलीस पाटील यांनी पोलीस स्टेशनची संपर्क साधत घडलेला प्रकार सांगितल्यानंतर पुढील कारवाई करण्यात आली. गेल्या आठवड्यातही विठ्ठल गंगाधर जावळे यांच्या वस्तीवर अशाच पद्धतीने चोरी झालेली होती. या घटनेत यांचे देखील दीड तोळे सोने चोरट्याने चोरले होते. सोनेवाडी परिसरातील या घटनेने आता वस्तीवर राहणारे नागरिक भयभीत झाले आहे. कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनच्या मार्फत या घटनेचा तपास लावण्याचे काम सुरू आहे . नागरिकांनी सतर्क राहावे असे आवाहन पोलीस निरीक्षक कोळी यांनी केले आहे.

# विहिरीत मृतदेह आढळला, चांडेवाडी शिवारातील घटना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**ममदापूर** : राहाता तालुक्यातील नांदूर परिसरातील चांडेवाडी शिवारात सुनील गणपत खेमनर (वय ४२) या इसमाचा मृतदेह विहिरीत आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. शनिवारी सकाळी शेतकरी जयराम घोरपडे हे विहिरीतील पाण्याची पातळी पाहण्यासाठी गेले असता त्यांना विहिरीत पाण्यावर तरंगताना मृतदेह असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

त्यांनी तात्काळ नातेवाईकांशी व पोलीस प्रशासनाशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली.या घटनेची मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह विहिरीतून बाहेर काढला.त्यांनतर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला होता. प्राथमिक माहितीनुसार मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, अपघात,आत्महत्या किंवा इतर कोणता प्रकार आहे का? याबाबत पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहेत.या मयताचे भाऊ संजय खेमनर यांच्याकडून माहिती घेतली असता, मयताचे मानसिक आरोग्य उपचार चालू असल्याचे सांगण्यात आले.घटनास्थळी मोठ्या संख्येने नागरिकांनी गर्दी केली. दोन दिवसांपूर्वीच सुनील खेमनर दुपारी चार वाजल्यापासून बेपत्ता झाले होते.नातेवाईक तेव्हापासून त्यांचा शोध घेत होते.

मयत खेमनर त्यांच्यामागे पश्चात एक मुलगा, एक मुलगी, पत्नी व दोन भाऊ असा मोठा परिवार आहेत.शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहेत. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहेत.

# श्रीरामपूर तालुक्यातील दूध डेअरींच्या आवक-जावकची चौकशी करा : भीमराज बागुल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाकडी** : राज्याचे कर्तव्यदक्ष आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर राज्यभर दूध भेसळ, खाद्यपदार्थांतील भेसळ, गुटखा आणि अवैध साठेबाजांविरोधात धडक कारवाया सुरू केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर श्रीरामपूर तालुक्यातील मोठ्या दूध डेअरी, दूध संकलन केंद्रे आणि दुग्धजन्य पदार्थ उत्पादक संस्थांच्या आवक-जावकची सखोल चौकशी करून भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय)चे अहिल्यानगर जिल्हा विभागप्रमुख भीमराज बागुल यांनी केली आहे.

बागुल यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, श्रीरामपूर तालुक्यातील काही मोठ्या दूध संकलन केंद्रे, डेअरी व दूध प्रक्रिया संस्था या आवक होणाऱ्या दुधापेक्षा अधिक क्षमतेने दूध व दुग्धजन्य पदार्थांचा पुरवठा करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे काही ठिकाणी रासायनिक पदार्थ, केमिकल पावडर किंवा अन्य साहित्याचा वापर करून दूध भेसळ होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. दूध भेसळीसाठी साहित्य पुरवणारे तसेच भेसळीचे प्रशिक्षण देणाऱ्या टोळ्यांचीही चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच अन्न व औषध प्रशासनाने श्रीरामपूर व परिसरातील मोठ्या दूध डेअरी, दूध पॅकिंग संस्था आणि दुग्धजन्य पदार्थ उत्पादकांच्या मागील काही वर्षांतील दूध खरेदी-विक्रीची आकडेवारी तपासावी, असेही त्यांनी म्हटले आहे. बागुल यांनी आरोप केला की, काही डेअरी चालक काही वर्षांपूर्वी आर्थिकदृष्ट्या अडचणीत असताना अल्पावधीतच त्यांनी कोट्यवधींची मालमत्ता, महागड्या गाड्या आणि जमिनी खरेदी केल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करून उत्पन्नाचे स्रोत तपासावेत.

# रोजगाराभिमुख शिक्षणासाठी महाराष्ट्र एज्युकेशन फोरमचा पुढाकार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**झरेकाठी** : राज्यातील शैक्षणिक संस्थासमोरील विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी तसेच शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर सर्वसमावेशक चर्चा आणि समन्वय साधण्यासाठी 'महाराष्ट्र एज्युकेशन फोरम' या व्यासपीठाची स्थापना करण्यात आली आहे. या फोरमची पहिली बैठक जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे व राज्यभरातील विविध शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी आणि संस्थाचालक यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. बैठकीत उपस्थित प्रतिनिधींनी सध्याच्या शैक्षणिक परिस्थितीवर आपली मते मांडत अभ्यासपूर्ण सूचना आणि मार्गदर्शन केले. बैठकीस महाराष्ट्र एज्युकेशन फोरमचे कार्याध्यक्ष श्री. राजेश पांडे, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती श्री. राजेंद्र विखे पाटील, नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक संस्थेचे श्री. नितीन ठाकरे, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे श्री. संदीप कदम, के. के. वाघ शिक्षण संस्थेचे श्री. समीर वाघ यांच्यासह राज्यातील विविध शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी शैक्षणिक संस्थांच्या विविध प्रश्नांबाबत एकत्रितपणे शासनाकडे प्रभावी पाठपुरावा करणे, नवीन शैक्षणिक बदलांविषयी संस्थांमध्ये सुसंवाद निर्माण करणे, तसेच केजी ते पीजी आणि व्यावसायिक शिक्षण अधिक कौशल्याधारित व रोजगाराभिमुख करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आवाहन ना डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

# श्रीरामपूरात बनावट विदेशी दारु पकडली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील आशीर्वादनगर भागात बनावट विदेशी दारू तयार करणाऱ्या एका अड्ड्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने धडक छापा टाकला.यात कारवाईत नामांकित ब्रँडच्या बनावट दारूच्या एकूण ११७ बाटल्या आणि एका दुचाकीसह १ लाख ४६ हजार ५१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी पोपट भास्कर पवार या आरोपीला अटक करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, आशीर्वादनगर येथे एका इसमाकडून बनावट विदेशी दारू तयार केली जात असल्याची खात्रीशीर माहिती राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र. २ (श्रीरामपूर) यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने १२ जून




२०२६ रोजी संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी तेथे 'इंपेरियल ब्ल्यु' आणि 'रॉयल स्टॅग' या नामांकित ब्रँड्सच्या बनावट दारूचे उत्पादन सुरू असल्याचे उघडकीस आले.

या घटनास्थळावरून आरोपी पोपट भास्कर पवार याला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (अ) (ब) (क ) (ड ) (ई ) (फ) ९० , १०३ ,१०८ कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रत्यक्षात या कारवाईत भरारी पथक क्र. २ चे निरीक्षक एस. एस. हांडे, दुय्यम निरीक्षक एस. सी. मांडवेकर, पी. आर. गायकवाड तसेच कर्मचारी एस. एस. गारळे, एस. ए. बटुळे, एस. एम. कासुळे, पी. व्ही. सागर, यु. डी. काळे, ओ. बी. पालवे, जि. बी. डेपले आणि बी. पी. काळे यांनी सहभाग घेतला. या गुन्ह्याचा पुढील तपास निरीक्षक एस. एस. हांडे करत आहेत.

### हातभट्टी मुक्तीसाठी समुपदेशनावर भर

कारवाईसोबतच विभागाने अवैध हातभट्टी निर्मूलनासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. या परिसरातील गोंधवणी, देवळाली प्रवरा आणि ममदापूर हे हातभट्टीची प्रमुख केंद्रे सध्या बंद करण्यात प्रशासनाला यश आले आहे. याशिवाय मौजे ममदापूर, राजुरी (ता. राहाता) आणि वारी (ता. कोपरगाव) येथे अवैध हातभट्टी व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींची स्थानिक सरपंच आणि ग्रामस्थांसोबत संयुक्त बैठक घेण्यात आली. या बैठकीत संबंधितांचे समुपदेशन करून त्यांना या गुन्हेगारी व्यवसायापासून परावृत्त होण्याचे आवाहन करण्यात आले.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व पथक

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्याचे आयुक्त राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपायुक्त (पुणे) सागर धोमकर, अधीक्षक (अहिल्यानगर १) प्रमोद सोनोने, अधीक्षक (अहिल्यानगर २) ऋषिकेश इंगळे आणि उपअधीक्षक प्रवीणकुमार तेली यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# शिर्डीला जाणाऱ्या भक्तांवर काळाचा घाला

## बाबरगाव फाट्याजवळ भीषण अपघातात तिघांचा मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : देवदर्शनासाठी निघालेल्या तरुण दाम्पत्याचा प्रवास आणि आपल्या कुटुंबासाठी उदरनिर्वाह करण्यासाठी रस्त्यावर असलेल्या ट्रक चालकाचा प्रवास एका क्षणात संपुष्टात आला. छत्रपती संभाजीनगर-गंगापूर मार्गावरील बाबरगाव फाट्याजवळ शनिवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात स्कुटीवरील दोघांसह ट्रक चालकाचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जालना येथील महादेव चंद्रकांत घुले (वय ३०) आणि मीरा कडूबा पांडव (वय २५) हे शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी स्कुटीवरून निघाले होते. सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास बाबरगाव फाट्याजवळ त्यांची स्कुटी आणि कर्नाटककडे जाणारा ट्रक यांच्यात भीषण अपघात झाला.

अपघात टाळण्याच्या प्रयत्नात ट्रक चालकाने वाहन वळविल्याचे सांगितले जात



असले, तरी स्कुटी ट्रकच्या मागील चाकाखाली गेल्याने महादेव घुले यांचा जागीच मृत्यू झाला. गंभीर जखमी झालेल्या मीरा पांडव यांना तातडीने गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. या अपघातात ट्रकही पलटी झाला.

ट्रकमध्ये अडकलेल्या चालकाला स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रयत्नांनी बाहेर काढले. मात्र गंभीर दुखापतीमुळे राजकुमार देवेंद्र आप्पा (वय ४६, रा. मंगलगी, कर्नाटक) यांचाही काही वेळात मृत्यू झाला. एका बाजूला देवदर्शनासाठी निघालेल्या दोन जीवांचा तर दुसऱ्या बाजूला कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी वाहन चालविणाऱ्या चालकाचा मृत्यू झाल्याने या दुर्घटनेने अनेक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली असून, अपघाताची माहिती मिळताच गंगापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. पुढील तपास सुरू आहे.

# निनो परिस्थितीचा प्रभावातून येणाऱ्या संकटामुळे, पाण्याचे आवर्तन बंद करण्याचे निर्देश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : भारतीय हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार यावर्षी एल निनो परिस्थितीचा प्रभाव राहण्याची शक्यता असून, पर्जन्यमानात घट होण्याची शक्यताही वर्तविली आहे. यासर्व पार्श्वभूमीवर राज्यातील विविध धरणं, जलाशय आणि जलस्त्रोतांमध्ये उपलब्ध असलेला पाणीसाठा संरक्षित करुन, सुरु असलेली पाण्याची आवर्तन तात्काळ बंद करण्याचे निर्देश जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डौले यांनी सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिका-यांना दिले आहेत.

या संदर्भात शासनाने काढलेल्या परिपत्रकात सर्व जिल्हाधिकारी व संबधित जलसंपदा विभागाच्या आधिका-यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील धरणं व जलाशयांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा तातडीने आढावा घ्यावा. अत्यावश्यक परिस्थिती वगळता पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या पाण्याचा वापर इतर कोणत्याही कारणांसाठी करु नये. दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत सर्व शहरी व ग्रामीण भागात अखंडीत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होईल यासाठी धरणांमध्ये आरक्षित करण्यात आलेला पाणीसाठा जपून वापरण्याबाबतही जिल्हास्तरावर कृती आराखडा तयार करण्याच्या सुचना प्रधान सचिवांनी दिल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था, पाणी पुरवठा विभाग यांच्यात प्रभावी समन्वय ठेवून परिस्थितीचा नियमित आढावा घेण्याबाबत तसेच धरणं, कालवे, नद्या, तलाव व इतर जलस्त्रोतांमधून होणारा अनाधिकृत व बेकायदेशिर पाणी उपसा तात्काळ थांबविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देशही शासनाने काढलेल्या परिपत्रात देण्यात आले आहेत. यासाठी महसूल, पोलिस व जलसंपदा विभागाच्या आधिका-यांच्या संयुक्त पथकांमार्फत अनधिकृत मोटारी, पाईपलाईन, पंप व इतर सामुग्रींची तपासणी करण्याकरीता गस्त आयोजित करावी व वेळप्रसंगी दिनांक १२ डिसेंबर २०१८ रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयाप्रमाणे कारवाईच्या कडक सुचनाही शासनाने परिपत्राकत दिल्या आहेत.

पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, सिंचन आवर्तने स्थगित करण्याबाबतची कार्यवाही व बेकायदेशिर पाणी उपसा रोखण्यासाठी करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल प्रत्येक आठवड्याला सादर करण्याच्या सुचना विभागीय आयुक्त, सर्व पाटबंधारे विकास महामंडळ, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी आधिकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आधिका-यांना देण्यात आल्या आहेत.